## वाशीत आजपासून 'महालक्ष्मी सरस' ; बचत गटांना प्रोत्साहन

**नवी मुंबई :** ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा आणि त्यांच्यातील कलागुणांचा सन्मान करण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या उमेद अभियानामार्फत आयोजित 'महालक्ष्मी सरस २०२६' या प्रदर्शन नवी मुंबईतील वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटर येथे २४ मार्च ते ४ एप्रिल २०२६ या कालावधीत सकाळी दहा ते रात्री दहा या वेळेत हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले असून ते विनामुल्य असणार आहे. या प्रदर्शनाचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे राज्यातील दुर्गम भागातून आलेल्या महिला बचत गटांच्या ग्रामीण भगिनींच्या कौशल्यपूर्ण आणि दर्जेदार उत्पादनांना राज्यस्तरीय व्यापक बाजारपेठेत विक्रीची संधी प्राप्त होते. या महिलांनी आपल्या मेहनतीने आणि जिद्दीने तयार केल्याल्या या उत्पादनांना नेहमीच मोठ्या प्रमाणात ग्राहकांची पसंती मिळत आली आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २४५
www.ramprahar.com

◆ मंगळवार, २४ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


'राजमाता जिजाऊ' एसटी बससेवेचे लोकार्पण/२

गाढी नदीवर पुलाच्या कामाला सुरुवात/३

उद्यापासून रायगड जिल्हा कबड्डी संघाचे सराव शिबिर/८


# होर्मुझ सामुद्रधुनीत अडथळा अस्वीकार्य

### लोकसभेत पंतप्रधान मोदींचा जगाला स्पष्ट संदेश



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम आशियातील तणाव आणि युद्धस्थितीवर लोकसभेत महत्त्वपूर्ण निवेदन करताना होर्मुझ सामुद्रधुनी (Strait of Hormuz) मधील अडथळा कोणत्याही परिस्थितीत मान्य नसल्याचे ठामपणे सांगितले.

पश्चिम आशियातील परिस्थिती चिंताजनक असल्याचे नमूद करत पंतप्रधान मोदी म्हणाले की, त्या भागात सुमारे एक कोटी भारतीय राहतात आणि कार्यरत आहेत. या मुद्द्यावर देशात सर्वपक्षीय एकमत असणे अत्यंत गरजेचे आहे. त्यांनी विविध देशांच्या नेत्यांशी संवाद साधल्याची माहितीही यावेळी दिली.

युद्ध सुरू झाल्यापासून आतापर्यंत ३.७५ लाखांहून अधिक भारतीयांना सुरक्षितपणे परत आणण्यात आले असून, इराण मधून सुमारे १,००० भारतीयांना परत आणले गेले आहे. यामध्ये अनेक वैद्यकीय विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

होर्मुझ सामुद्रधुनीचे महत्त्व अधोरेखित करत पंतप्रधान म्हणाले की, भारतात येणाऱ्या कच्च्या तेलाचा, गॅसचा, खतांचा आणि इतर ऊर्जा स्त्रोतांचा मोठा हिस्सा या मार्गावर अवलंबून आहे. युद्धामुळे जहाजांच्या हालचालींमध्ये अडचणी निर्माण झाल्या असल्या तरी देशातील इंधनपुरवठ्यावर परिणाम होऊ नये यासाठी सरकार प्रयत्नशील आहे.

भारत आपल्या एलपीजी गरजांपैकी सुमारे ६० टक्के आयातीवर अवलंबून असल्याचे सांगत त्यांनी घरगुती ग्राहकांना प्राधान्य देण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले. तसेच देशांतर्गत उत्पादन वाढवण्यावरही भर दिला जात असल्याचे मोदींनी सांगितले.

पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट इशारा देत म्हटले की, आंतरराष्ट्रीय जलमार्गात अडथळे निर्माण करणे, व्यापारी जहाजांवर हल्ले करणे आणि ऊर्जा पायाभूत सुविधांवर आघात करणे अस्वीकार्य आहे. भारत नेहमीच शांतता आणि संवादाच्या बाजूने उभा राहिला असून, कूटनीतीच्या माध्यमातून तणाव कमी करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

या युद्धाचा परिणाम दीर्घकालीन राहू शकतो, त्यामुळे देशाने एकजूट राखणे आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. चुकीची माहिती पसरवणाऱ्यांपासून सावध राहण्याचे आवाहन करत त्यांनी सांगितले की, भारत सर्व संबंधित देशांशी संपर्क ठेवून परिस्थितीवर लक्ष ठेवत आहे.

### सरकारचा 'प्लॅन बी' ठरतोय यशस्वी

तेल आणि गॅस संकटाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत 'प्लॅन बी' चा उल्लेख केला. जो भारतात पुरवठा सुनिश्चित करण्यास मदत करत आहे. आम्ही आमच्या आयातीमध्ये सातत्याने विविधता आणली आहे. पूर्वी भारत केवळ २७ देशांकडून ऊर्जा आयात करत असे, पण आता ही संख्या ४१ पर्यंत वाढली आहे. याशिवाय आमची रिफायनरी क्षमताही वाढली आहे. भारताकडे ५.३ दशलक्ष मेट्रिक टन कच्च्या तेलाचा साठा आहे. आमचे लक्ष्य ६.५ दशलक्ष मेट्रिक टन आहे. सर्व अत्यावश्यक वस्तू घेऊन जाणारी जहाजे भारतात सुरक्षितपणे पोहचतील याची खात्री करणे हा आमचा प्रयत्न आहे, असे मोदींनी सांगितले.

# केरळातील कासरगोडमध्ये भाजप-एनडीएचे शक्तिप्रदर्शन

### भाजप महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केरळ विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत कासरगोड मतदारसंघात भारतीय जनता पक्ष आणि एनडीए आघाडीने मोठे शक्तिप्रदर्शन करत अधिकृत उमेदवार अश्विनी एम.एल. यांनी आपला उमेदवारी अर्ज अत्यंत उत्साही वातावरणात आणि कार्यकर्त्यांच्या प्रचंड जनसमुदायात दाखल केला. यावेळी भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रभारी म्हणून प्रमुख उपस्थिती होती.

उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी रॅलीमध्ये कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला पोहचला होता. ढोल-ताशांचा गजर, भारत माता की जयच्या घोषणा आणि हातात भाजपचे झेंडे घेतलेले हजारो



समर्थक यावेळी रस्त्यावर उतरले होते. या रॅलीने संपूर्ण कासरगोड शहर भगवेमय झाले होते. मतदारांचा वाढता पाठिंबा आणि कार्यकर्त्यांमधील हा अभूतपूर्व जोश पाहता, (पान २ वर..)

# राजिपच्या विषय समिती सभापतींची बिनविरोध निवड



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या (राजिप) विविध विषय समित्यांच्या चार सभापतीपदी शिवसेनेचे चंद्रकांत व रसिका केणी, भाजपचे गटनेते वैकुंठ पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे नारायण डामसे यांची निवड बिनविरोध करण्यात आली. सभापतींची निवड करण्यासाठी जिल्हाधिकारी येथील नियोजन भवनातील सभागृहात विशेष सभा सोमवारी (दि.२३) आयोजित करण्यात आली होती.

चंद्रकांत कळंबे, रसिका केणी, वैकुंठ पाटील आणि नारायण डामसे यांचे प्रत्येकी एक अर्ज सभापतीपदासाठी आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे पिठासीन अधिकारी सुनील थोरवे यांनी जाहीर करण्यात आले. पिठासीन अधिकारी सुनील थोरवे यांना उपजिल्हाधिकारी रवींद्र शेळके, रायगड जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जालिंदर पठारे, तहसीलदार डॉ. शितल रसाळ यांनी सहाय्य केले. (पान २ वर..)

# व्यावसायिक एलपीजी गॅसच्या कोट्यात ५० टक्क्यांपर्यंत वाढ

### हॉटेल आणि उद्योगांना मोठा दिलासा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

देशातील व्यावसायिक एलपीजी (LPG) गॅसच्या पुरवठ्याबाबत केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, राज्यांना दिल्या जाणाऱ्या एकूण कोट्यात आता ५० टक्क्यांपर्यंत मोठी वाढ करण्यात आली आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे सचिव डॉ. नीरज मित्तल यांनी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्राद्वारे या निर्णयाची माहिती दिली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी राज्य शासनाच्या सूचनेनुसार करण्यात येईल, अशी



माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे.

या नव्या धोरणानुसार, राज्यांना यापूर्वी मिळणाऱ्या २० टक्के आणि त्यानंतर सुधारणांच्या आधारे वाढविण्यात आलेल्या १० टक्के कोट्याव्यतिरिक्त आता अतिरिक्त २० टक्के कोटा मंजूर करण्यात आला आहे. यामुळे व्यावसायिक एलपीजीचा एकूण पुरवठा आता संकटपूर्व काळातील पातळीच्या ५० टयांवर पोहोचला आहे. या वाढीव कोट्याचा सर्वाधिक फायदा रेस्टॉरंट्स, ढाबे, हॉटेल्स, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया उद्योग, दुग्धशाळा आणि सरकारी अनुदानित अन्न केंद्रांना होणार आहे. तसेच स्थलांतरित मजुरांसाठी उपलब्ध असलेल्या ५ किलोच्या एफटीएल (FTL) सिलिंडर पुरवठ्यालाही यात प्राधान्य देण्यात आले आहे.

या सुविधेचा लाभ घेण्यासाठी सरकारने काही अटीही लागू केल्या आहेत. सर्व व्यावसायिक आणि औद्योगिक एलपीजी ग्राहकांना संबंधित तेल कंपन्यांकडे (OMCs) आपली अधिकृत नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या कंपन्या ग्राहकांच्या वार्षिक वापराचा आणि त्यांच्या क्षेत्राचा संपूर्ण रेकॉर्ड ठेवणार आहेत, जेणेकरून गॅसचा गैरवापर टाळता येईल. यासोबतच, ज्या भागात पाईप गॅसची (PNG) सुविधा उपलब्ध आहे, तिथे ग्राहकांनी पीएनजीसाठी अर्ज करणे आणि त्या वापरासाठीची तयारी दर्शविणे आवश्यक आहे.

या निर्णयामुळे व्यावसायिक क्षेत्रातील इंधन टंचाई दूर होण्यास मदत होणार असून उद्योगांना मोठा दिलासा मिळणार असल्याचा विश्वास शासनाने व्यक्त केला आहे.

## निवडक

### प्रयागराजमध्ये अपघातात नऊ कामगारांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** प्रयागराजच्या फाफामऊ परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली. एका कोल्ड स्टोरेजची भिंत अचानक कोसळल्याने मोठा अपघात झाला. या अपघातात आतापर्यंत नऊ कामगारांचा मृत्यू झाला आहे. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, भिंत कोसळण्यापूर्वी स्फोटासारखा मोठा आवाज ऐकू आला, त्यानंतर संपूर्ण भिंत कोसळली. अपघात झाला तेव्हा कोल्ड स्टोरेज सुविधेमध्ये सुमारे २० कामगार काम करत होते. भिंत कोसळल्याने अनेक कामगार ढिगाऱ्याखाली गाडले.

### अशोक खरातने शेतकऱ्याला ठार मारल्याचा आरोप

**नाशिक :** अशोक खरातवर एका शेतकऱ्याची जमिनीसाठी हत्या केल्याचा आरोप गवळणे येथील एका शेतकऱ्याने केला. कैलास जाधव यांनी केलेल्या आरोपानुसार, खरात याने फसवणूक करून जमीन बळकावली होती. या वादावर न्यायालयात सुनावणी सुरू होती, पण न्यायालयाचा अंतिम निकाल अवघ्या दोन दिवसात येणार होता, तेवढ्यात जाधव यांच्या भावाचा संशयास्पद अपघाती मृत्यू झाल्याचा दावा त्यांनी केला.

# उलवे येथे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते वृक्षारोपण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विविध सामाजिक, शैक्षणिक व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर आज उलवे नोड मधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलच्या प्रांगणात वृक्षारोपणाचा कार्यक्रम जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमास जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, पंचायत समिती सदस्य वितेश म्हात्रे, पंचायत समिती सदस्या जिज्ञासा कोळी, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, सचिन घरत, ज्येष्ठ कार्यकर्ते जयवंत देशमुख, ॲड. राहुल घरत, दर्शन ठाकूर, स्वप्नील ठाकूर, विश्वनाथ कोळी, भार्गव ठाकूर, हेमंत पाटील, रोशन म्हात्रे, हेमंत ठाकूर, दीपक गोंधळी, नंदकुमार ठाकूर, रविकांत म्हात्रे, राजू कोळी, किशोर कोळी, रवींद्र भोईर, विशाल कोळी, राजकिरण कोळी, विनायक कोळी, भरत कोळी, दीपाली म्हात्रे, संदेश कोळी, मंगेश कोळी, संतोष कोळी, सृजन कोळी यांच्यासह इतर पदाधिकारी, शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध प्रकारच्या रोपांचे लागवड करण्यात आले.

यावेळी " वृक्ष एक जबाबदारी" हा संदेश देत पर्यावरण संरक्षणाचे उद्दिष्ट अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरात हरिताई वाढण्यास हातभार लागणार असून, सामाजिक बांधिलकी जपणारा हा कार्यक्रम सर्वांच्या स्मरणात राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



# क्रीडाप्रेमी नगरसेवक परेश ठाकूर यांच्याकडून कुस्तीपटूंना प्रोत्साहन

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील वाघोली येथील स्वर्गीय अजितदादा पवार क्रीडानगरीमध्ये १८ ते २२ मार्च दरम्यान ६८व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे अत्यंत दिमाखात आयोजन करण्यात आले होते. कुस्ती क्षेत्रातील या सर्वोच्च आणि मानाच्या स्पर्धेला रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष तथा पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर यांनी भेट देऊन खेळाडूंचा उत्साह वाढवला.

महाराष्ट्राच्या मातीतील या ऐतिहासिक क्रीडा परंपरेला जपावे आणि ग्रामीण भागातील मल्लांना बळ मिळावे, या उद्देशाने त्यांनी या स्पर्धेच्या मैदानात हजेरी लावली. यावेळी त्यांच्यासोबत पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक हॅप्पी सिंग यांच्यासह कुस्ती क्षेत्रातील अनेक मान्यवर, पदाधिकारी आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाच दिवस चाललेल्या या स्पर्धेत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या मल्लांनी आपल्या कौशल्याचे प्रदर्शन केले. परेश ठाकूर यांनी यावेळी आखाड्यातील कुस्त्यांचा आनंद घेतला.

# 'अवघ्या आशा श्रीरामार्पण' कार्यक्रमाने रसिक मंत्रमुग्ध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री रामनवमीचे औचित्य आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षाचे निमित्त साधून भारतीय जनता पार्टी सांस्कृतिक सेल, उत्तर रायगडच्या वतीने एका विशेष सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.' अवघ्या आशा श्रीरामार्पण' या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमातून गीत रामायणाच्या माध्यमातून रामतत्त्वाची कालसुसंगत मांडणी २२ मार्च रोजी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात अत्यंत दिमाखात सादर करण्यात आली. भक्ती, संस्कृती आणि सुरेल संगीताचा त्रिवेणी संगम असलेल्या या कार्यक्रमाने उपस्थित शेकडो रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी कार्यक्रमाला भेट देऊन सादरीकरणाचा आस्वाद घेतला. रामायणातील विचार आजही तितकेच प्रेरणादायी असून संगीताच्या माध्यमातून ते लोकांपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. या सांस्कृतिक सोहळ्याला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, आयोजक व नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, नगरसेवक अजय बहिरा, गणेश कडू, सुमित झुंजारराव, माजी नगरसेविका सारिका भगत, रुपेश नागवेकर, अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, श्याम पुंडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात स्नेहल दामले यांनी प्रभावी कथनातून रामायणातील प्रसंग जिवंत केले, तर अभिजीत पंचभाई आणि श्रुती देवस्थळी यांच्या भावपूर्ण गायनाने वातावरण भक्तिमय झाले. त्यांना उद्धव कुंभार, अमित कुंटे आणि प्रसन्न बाम यांनी दर्जेदार वाद्यसंगत दिली.

दरम्यान, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त वर्षभर विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

# प्रदूषण नियंत्रणासाठी भाजपचा कृती आराखडा

### नवी मुंबईत अचूक मापन, स्रोतांची वैज्ञानिक ओळख, नियमभंगावर कडक कारवाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शहरातील वाढते वायुप्रदूषण, घसरलेली हवा गुणवत्ता आणि बाहेरील औद्योगिक पट्ट्यांमधून होणारा प्रदूषणाचा परिणाम या पार्श्वभूमीवर सत्ताधारी भाजपने नवी मुंबई महापालिकेत १८ महिन्यांचा सविस्तर 'हवा प्रदूषण निर्मूलन व वायू गुणवत्ता सुधार' कृती आराखडा मांडला आहे. प्रदूषणाचे अचूक मापन, स्रोतांची वैज्ञानिक ओळख आणि नियमभंगावर कडक कारवाई या त्रिसूत्रीवर आधारित हा आराखडा एमएमआर क्षेत्रात पहिल्यांदाच राबविण्यात येणार असल्याचा दावा करण्यात आला आहे.

शहरातील हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक (AQI) धोकादायक पातळीवर पोहचत असताना, विशेषतः मध्यरात्री काही भागांत जाणवणाऱ्या दुर्गंधीयुक्त प्रदूषणामुळे नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर सभागृह नेते सागर नाईक यांनी ९० पानी मुख्य आराखडा आणि ७० पानी तांत्रिक अनुसूची तयार करून सभागृहात सादर करण्याची तयारी दर्शवली आहे.

या आराखड्याची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असून, पहिल्या टप्प्यात शहरभर अत्याधुनिक हवा गुणवत्ता मापन यंत्रणा उभारली जाणार आहे. विविध भागांत सेन्सर्स आणि सतत निरीक्षण केंद्रे बसवून PM10, PM2.5सह विविध प्रदूषकांचे रिअल-टाइम मापन केले जाईल. यासोबत तापमान, वाऱ्याची दिशा व वेग यांचाही अभ्यास केला जाणार आहे.

दुसऱ्या टप्प्यात प्रदूषणाचे 'हॉटस्पॉट' ओळखण्यावर भर दिला जाणार आहे. वाहतूक कोंडीचे मार्ग, बांधकाम क्षेत्रे, औद्योगिक पट्टे आणि दाट वस्तीचे भाग यांचे स्वतंत्र नकाशे तयार करून त्या भागांवर लक्ष केंद्रित केले जाईल. आराखड्यातील महत्त्वाचा भाग म्हणजे प्रदूषण स्थानिक आहे की बाहेरील, हे ओळखण्याची वैज्ञानिक यंत्रणा. (पान २ वर..)

# ‘राजमाता जिजाऊ’ एसटी बससेवेचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

## एसटी ताफ्यात तीन हजार अत्याधुनिक स्मार्ट बसेसची भर




**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत राज्याच्या सार्वजनिक परिवहन व्यवस्थेतम्हणजेच एसटीच्या ताफ्यातनव्या पर्वाची सुरुवात होत आहे. ‘राजमाता जिजाऊ’ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अत्याधुनिक एसटी बससेवेचे लोकार्पण सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्या, दि. २४ मार्च रोजी विधिमंडळाच्या प्रांगणात संपन्न होणार आहे. या सोहळ्यास विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे आणि विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, ‘राजमाता जिजाऊ’ बससेवेच्या समावेशामुळे एसटीच्या ताफ्यात परंपरा आणि प्रगती यांचा सुंदर संगम साधला गेला आहे. लवकरच एसटी महामंडळाच्या ताफ्यात तब्बल ३ हजार ‘राजमाता जिजाऊ’ या नावाने नव्या स्मार्ट बसेस दाखल होणार असून, त्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला मोठे बळ मिळणार आहे. या बसेसना ‘राजमाता जिजाऊ’ हे नाव देण्यामागे हिंदवी स्वराज्याच्या प्रेरणास्थान असलेल्या जिजाऊसाहेबांना अभिवादन करण्याची भावना आहे. स्वराज्याचे शिल्पकार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मागील संस्कारशक्ती म्हणजे राजमाता जिजाऊ होय.

या मातृशक्तीचा गौरव या नावातून अधोरेखित करण्यात आला आहे. एसटी महामंडळाने यापूर्वी ‘शिवनेरी’, ‘शिवशाही’, ‘शिवाई’, ‘यशवंती’ आणि ‘हिरकणी’ अशा ऐतिहासिक नावांनी बससेवेला वेगळी ओळख दिली आहे. त्या गौरवशाली परंपरेत आता ‘राजमाता जिजाऊ’ या नावाची भर पडल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा सन्मान अधिक समृद्ध झाला आहे, असेही मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.

‘राजमाता जिजाऊ’ बससेवा ही केवळ वाहतुकीची सुविधा नसून महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभिमान आणि आधुनिकतेचा आत्मविश्वास यांचा संगम आहे. या उपक्रमामुळे राज्यातील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम, सुरक्षित आणि प्रवासी–केंद्रित होईल, अशी अपेक्षा मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली.

**नव्या बसेसची वैशिष्ट्ये**

या बसेसमध्ये ३२ आसन रचना असून एकूण ५६ आसन क्षमता आहे, जी सध्याच्या बसेसपेक्षा १६ आसनांनी अधिक आहे. त्यामुळे प्रवाशांना अधिक आरामदायी आणि सुलभ प्रवासाचा अनुभव मिळणार आहे.

अत्याधुनिक सुविधांनी सज्ज असलेल्या या बसमध्ये ४ सीसीटीव्ही कॅमेरे, जीपीएस यंत्रणा, पॅनिक बटन, पब्लिक अनाउन्समेंट सिस्टीम तसेच इलेक्ट्रॉनिक मार्ग फलक यांचा समावेश आहे. त्यामुळे प्रवास अधिक सुरक्षित आणि स्मार्ट होणार आहे.

या बसेस प्रामुख्याने दोन शहरांदरम्यानच्या अतिगर्दीच्या मार्गांवर शटल सेवेसाठी चालविण्यात येणार असून, त्यामुळे प्रवाशांचा वेळ वाचेल आणि वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होईल.

# कर्जत-मुरबाड मार्गावर एक कोटीचा अवैध मद्यसाठा जप्त



**कर्जत : प्रतिनिधी**

गोवा राज्यातून गुजरात राज्याकडे पुष्पा सिनेमातील एका दृश्यप्रमाणे टँकर मधून मोठया प्रमाणात विदेशी मद्यसाठ्याची अवैधरीत्या तस्करी करणाऱ्या टँकरवर रात्रीचे सुमारास नेरळ पोलीसांनी कार्यवाही करत तब्बल एक कोटी एक लाख २७ हजार ६०० रुपये किंमतीच्या मद्यसाठ्यासह टँकर जप्त करत, टँकर चालकाला ताब्यात घेतले आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार खात्रीलायक बातमीदाराकडून मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार गोवा राज्यातून मोठया प्रमाणात अवैधरीत्या मद्यसाठ्याची तस्करी होणार असल्या प्रमाणे रायगड पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड व नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक राहुल वरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली नेरळ पोलिसानी संयुक्तरीत्या कर्जत– मुरबाड–शहापूर या राज्य महामार्गावर सापळा रचला.

यामध्ये रात्रीचे २१.१५ वाजण्याचे सुमारास वाहान तपासणीदरम्यान वारे गावचे हद्दितील कोकण किनारा हॉटेलच्या समोर आरोपीत नामे लादुराम राजस्थान हा खियाराम बिष्णोई (वय ४२, रा. सिया गुंकेबेरी, राजस्थान) हा त्याच्या ताब्यातील टँकर (जीजे १२ एडब्ल्यु ४४२१) यामधुन गोवा बनावटीची विदेशी मद्यची विनापरवाना गोवा ते गुजरात अशी वाहतुक करत असल्याचा संशय आल्याने नेरळ पोलीसांनी सदर टँकरची पाहणी केली असता या टँकरमध्ये गोवा विदेशी बनावटीचा मद्यसाठा अढळून आल्याने, सदर टँकरसह विदेशी बनावटीचा मद्यसाठा जप्त करत टँकर चालक याला अटक करण्यात आले आहे.

नेरळ पोलिसांचे या कार्यवाहीमध्ये २९लाख रू किमतीचा टाटा कंपनीचा टँकर व एकूण एक कोटी एक लाख २७ हजार ६०० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

या कार्यवाही मध्ये नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सुनिल शेंबडे, पोलीस उपनिरीक्षक श्रीरंग किसवे यांच्यासह पोलीस हवालदार, पोलीस अंमलदार आणि पोलीस कर्मचाऱ्यांनी महत्वपूर्ण कामगिरी बजावली.

# ईरटीका-मिनीडोर अपघातात मिनीडोरमधील चौघे जखमी

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील भोराव गाव हद्दीत पंढरपूर राज्य मार्गावर रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास ईरटीका कार आणि मिनीडोर रिक्षामध्ये झालेल्या भीषण अपघातात चार जण जखमी झाले. जखमींवर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मिनीडोर रिक्षा (क्र. एमएच ०६ एस ४५५७) सवाद गावाकडे वळत असताना समोरून येणाऱ्या ईरटीका कारने (क्र. एमएच १२ वाय एस १२७८) जोरदार धडक दिली. कार चालकाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अति वेगाने वाहन चालवत विरुद्ध दिशेला जाऊन ही धडक दिल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

या अपघातात मिनीडोर चालक वहाब इस्माईल तिवडेकर (वय ५२, रा. कालवली, ता. पोलादपूर), तसेच रोहित रवींद्र पवार (रा. भेलोशी, ता. महाड), तेजस संदीप पाटेकर आणि रोशन प्रमोद कर्जावकर (वय १७, रा. सवाद, ता. महाड) हे चौघे जखमी झाले.

या प्रकरणी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला

# महामार्गावर बंद फोर्कलिफ्टमुळे अपघाताला निमंत्रण



**खोपोली: प्रतिनिधी**

जुन्या मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर बंद पडलेल्या फोर्कलिफ्ट मुळे अपघाताची शक्यता वाढली आहे. खोपोलीहून पनवेल कडे जाताना वाहतुकीच्या मार्गात खालापूर हद्दीत फोर्कलिफ्ट बंद अवस्थेत आहे. चार दिवसापासून फोर्कलिफ्ट एकाच जागी उभी असून पाठीमागून येणाऱ्या वाहन चालकांना पूर्व सूचना मिळेल अशी कोणतीही खबरदारी फोर्कलिफ्ट मालकाकडून घेण्यात आलेली नाही. या ठिकाणी रात्रीच्या वेळेस बंद वाहनाचा अंदाज न आल्याने दुचाकीस्वाराचा आदळून मृत्यू झाल्याची घटना घडली होती. याबाबत योग्य ती कारवाई वाहतूक पोलिसांनी करावी अशी मागणी होत आहे.

# कारची दोन दुचाकींना ठोकर ; पाच जण जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई गोवा महामार्गावर कारची दोन दुचाकांनी ठोकर लागून झालेल्या अपघातात ५ जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सविस्तर वृत्त असे की, दि. २२ मार्च रोजी रात्री ११.४५ वा. नाणोरे गावच्या हद्दीतील एच पी पेट्रोल पंपजावळ तक्रारदार रोहित रमेश मुंढे, वय २१ वर्ष हे त्यांचे ताब्यातील स्कुटी क्र एम एच ०६ बीएच ३६६७ वरून त्यांच्या चुलत भावासोबत माणगाव येथुन गोवा–मुंबई महामार्गावरुन त्यांच्या दाखणे गावाकडे जात असताना नाणोरे गावच्या हददीतील एच पी पंपा जवळ आले वेळी त्यांच्या समोरुन मुंबई बाजुकडुन येणा–या नेक्सा कार क्र एक्स. एल. ०६ एम.एच ०५ एफ.पी.३८५० वरील कार चालक अमित मेहता, वय ४३ वर्ष, याने तक्रारदार यांचे स्कुटीला व पाठीमागुन येणारी बजाज प्लसर दुचाकी क्र. एम. एच ०२ एम ७५२३ हिचे वरील तिघे असे एकुण ०५ जणांना समोरुन



विरुध्द बाजुस येउन ठोकर मारुन अपघात केला. या अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान होऊन ५ जण जखमी झाले आहेत.

# टेंभरी आदीवासीवाडीतून अल्पवयीन मुलगी बेपत्ता

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यातील चौक हद्दीतील टेंभरी आदीवासीवाडी येथील अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याची घटना रविवारी घडली. १७ वर्षे वय असलेली मुलगी रविवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घरातून बाहेर पडली . संध्याकाळी उशिरापर्यंत घरी न आल्याने पालकांनी तिचा सर्वत्र शोध घेतला. परंतु तिचा काहीच तपास लागला नाही .मुलगी अल्पवयीन आहे हे माहीत असताना सुध्दा कोणीतरी अज्ञात इसमांनी तीला कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन फुस लावुन पळवुन नेल्याची तक्रार मुलीच्या पालकांनी खालापूर पोलीस ठाण्यात दिली आहे. अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार विशाल पवार हे करीत आहेत.

# वाशीत रेल्वे प्रवासी भजन मंडळांचा भक्ती–शक्तीचा जागर सोहळा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेचे उपमहापौर दशरथ भगत यांच्या पुढाकारातुन वाशी येथील सिडको एक्सझीबिशन सेंटर येथे एमएमआरडीए क्षेत्रातील मध्य, पश्चिम व हार्बर लाईन या रेल्वे मार्गांवरून प्रतिदिन हरीनामाचा गजर करीत प्रवास करणाऱ्या चाकरमानी रेल्वे प्रवासी भजन मंडळांची एकत्रित भजन स्पर्धा रविवारी मोठ्या उत्साहात संपन्न झाली.



विठुरायाच्या व संत महात्म्यांच्या चिरकाल आत्मानंदाची अनुभूती देणाऱ्या ओव्यांचे गुणगान असलेल्या या नादब्रम्हाच्या अनुभूती सागरस्थळी राज्याचे वनमंत्री ना. गणेश नाईक यांची प्रमुख उपस्थित लाभली, मंत्री नाईक यांनी काही वेळ या नामसंकीर्तन सोहळ्यात समरस होऊन अभंग गीतांचे श्रवण देखील केले.

नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्था आयोजित छत्रपती शिवराय भजन मंडळ, वाशी आणि श्री संत तुकाराम महाराज भजन रेल्वे प्रवासी मंडळ यांच्या सहकार्याने आयोजित रेल्वे प्रवासी भजन स्पर्धेचे यंदाचे ३ रे वर्ष होते.रेल्वेतील भजनी मंडळींना रेल्वे पोलीस अनेकदा पकडून कारवाई करतात याबाबतीत आता आपले सरकार केंद्रात व राज्यात असून यापुढेही असा त्रास होणार नाही, तसेच नवी मुंबईत हार्बर मार्गावरील भजनी मंडळी संघटित रहावीत यासाठी रेल्वे प्रवासी वारकरी भवनासाठी देखील प्रयत्न करू असे मंत्री नाईक यांनी यावेळी सांगितले .हरीनामाच्या सानिध्यात भक्तीतून मनुष्याच्या व्यक्तिमत्वात सात्विकता येते व त्याचे परमार्थिक अधिष्ठान हे आचार व विचारांनी सुदृढ बनवते ज्यातून लोकसेवेसाठी शक्ती मिळते याचे उत्तम उदाहरण दशरथ भगत असून जनसेवा व विविध धर्मीय पारमार्थिक सेवेमुळेच आज ते उपमहापौर म्हणून विराजमान आहेत असे देखील गौरोदगार ना.गणेश नाईक यांनी काढले.

# पालकांचे स्थलांतर, पण मुले शाळेतच रमली!

## रायगड जिल्हा परिषद शाळा आदिवासी वाडीचा प्रेरणादायी पॅटर्न

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात नोव्हेंबर महिन्यानंतर रोजगारासाठी आदिवासी बांधवांचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होते. या स्थलांतराचा सर्वाधिक फटका बसतो तो चिमुकल्यांच्या शिक्षणाला. पालक सोबतीला मुलांनाही घेऊन जात असल्याने अनेक शाळा ओस पडतात आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला खीळ बसते, मात्र या परंपरेला छेद देत रायगड जिल्हा परिषद शाळा रासळ आदिवासी वाडी येथील २३ विद्यार्थ्यांनी यंदा एक नवा आदर्श निर्माण केला आहे. पालकांचे स्थलांतर झाले असले, तरी ही मुले गावातच राहून आनंदाने शिक्षण घेत आहेत.



पूर्वी रासळ आदिवासी वाडी येथील सर्व कुटुंबे दिवाळीनंतर म्हणजे नोव्हेंबरनंतर आपल्या पाल्यांना घेऊन कामासाठी बाहेर पडत असत, परंतु शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये शाळेने एक विशेष पाऊल उचलले. जून महिन्यापासूनच विद्यार्थ्यांमध्ये शाळेची गोडी निर्माण करण्यासाठी भौतिक सुविधांमध्ये बदल करण्यात आले.

कृतीद्वारे शिक्षण आणि प्रत्यक्ष अनुभवावर आधारित अध्यापन पद्धतीमुळे मुले अभ्यासात रमली. विद्यार्थ्यांमधील हा बदल पाहून पालकांनीही एक धाडसी निर्णय घेतला; त्यांनी मुलांना सोबत न नेता गावातील आजी–आजोबांकडे ठेवून कामावर जाणे पसंत केले.

सध्या ही २३ मुले आपल्या आजी–आजोबांच्या मायेच्या सावलीत राहत असून दररोज न चुकता शाळेत येत आहेत. शाळेत नियमित आल्यामुळे त्यांच्यामध्ये स्वच्छतेच्या चांगल्या सवयी रुजल्या आहेत.

# सरकारच्या आश्वासनानंतर सफाई कामगारांचा आझाद मैदानात जल्लोष

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या मालकी हक्काच्या घरांच्या मागणीसाठी म्युनिसिपल मजदूर युनियनने पुकारलेले 'वर्षा' निवासस्थानावरील आंदोलन यशस्वी झाले व सरकारने दिलेल्या आश्वासनानंतर सफाई कामगारांचा जल्लोष आझाद मैदानात पाहायला मिळाला. म्युनिसिपल मजदुर युनियनचे अध्यक्ष अशोक जाधव यांच्या नेतृत्वाखाली हजारो सफाई कामगार आपल्या कुटुंबासह मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी धडकले होते. यावेळी झालेल्या चर्चेत सरकारने सफाई कामगारांच्या घरांच्या प्रश्नावर लवकरच ठोस निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करून कामगारांना न्याय दिला जाईल अशोक जाधव यांनी स्पष्ट केले की, "आम्ही सरकारवर विश्वास ठेवून तूर्तास आंदोलन स्थगित करत आहोत, मात्र सरकारने दिलेल्या शब्दाला सरकार जर जागले नाही तर अधिक उग्र आंदोलन छेडले जाईल.

पान १ वरुन

## केरळातील कासरगोडमध्ये भाजप–एनडीएचे शक्तिप्रदर्शन

या मतदारसंघात यावेळी निश्चितपणे परिवर्तन होऊन भाजप महायुतीचा विजय होईल, असा ठाम विश्वास आमदार प्रशांत ठाकूर आणि इतर नेत्यांनी यावेळी व्यक्त केला.

या सोहळ्यासाठी कर्नाटकचे आमदार हरेश पुंजा, आमदार गुरुराज गंटीहोळी, प्रसिद्ध दाक्षिणात्य अभिनेत्री हर्षिका पूजनाचा, पनवेल महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती तथा नगरसेवक संतोष शेट्टी, शिवाजी भगत, अक्षय सिंह, जयचंद्रन वासु, शिवाजी शेट्टी, सुभाष शेट्टी, अभिलाष शेट्टी, सुजीत पुजारी यांच्यासह एनडीएचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजिपच्या विषय समिती सभापतींची बिनविरोध निवड

महिला व बालविकास समिती सभापतीपदी जि.प. सदस्य रसिका केणी तर समाजकल्याण समितीपदी नारायण डामसे यांची निवड करण्यात येणार आली. अन्य दोन सभापतींच्या खात्याचे वाटप होणे बाकी आहे. उर्वरित विषय समित्यांचे वाटप ७ एप्रिल रोजी करण्यात येणार आहे. चारही सभापतींच्या निवडीनंतर रोजगार हमी मंत्री भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, माजी आमदार अनिकेत तटकरे, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनी सभापतींचे अभिनंदन केले.

## प्रदूषण नियंत्रणासाठी भाजपचा कृती आराखडा

‘व्हर्टिकल ॲटमॉस्फेरिक प्रोफाइलिंग’ (बलून प्रणाली) वापरून वेगवेगळ्या उंचीवर प्रदूषणाचे मापन केले जाणार आहे. यामुळे तळोजा किंवा इतर औद्योगिक भागांतून येणारे प्रदूषण आणि शहरातील स्थानिक प्रदूषण यामध्ये स्पष्ट फरक करता येणार आहे.

महापालिका थेट बाहेरील प्रदूषणावर कारवाई करू शकत नसली तरी, अशा प्रदूषणाचा वैज्ञानिक पुरावा गोळा करून संबंधित प्रादेशिक व राज्यस्तरीय यंत्रणांकडे पाठपुरावा करण्याची तरतूद आराखड्यात आहे. त्याचवेळी स्थानिक पातळीवरील प्रदूषण कमी करून एकूण परिणाम कमी करण्यावर भर देण्यात आला आहे.

तिसऱ्या टप्प्यात अभियांत्रिकी उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. रस्त्यांवरील साचलेली धूळ काढण्यासाठी यांत्रिक स्क्रॅपिंग, व्हॅक्यूम स्वीपिंग आणि उच्च दाबाच्या पाण्याच्या फवाऱ्यांचा वापर केला जाईल. ‘झिरो एक्स्पोज्ड सॉइल’ धोरणांतर्गत उघडी माती पूर्णपणे बंद करून रस्त्यांच्या कडांना स्थिरीकरण केले जाणार आहे. बांधकाम व पाडकाम प्रकल्पांसाठी कडक नियम लागू करण्यात येणार असून, साइटवर धूळ रोखण्यासाठी पडदे, पाणी फवारणी, वाहन स्वच्छता यांची सक्ती केली जाणार आहे.

# सरपंच चंद्रकांत भोईर यांना द ग्रेट छत्रपती शिवाजी महाराज अवॉर्डने सन्मानित



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आर्ट्स, टुरिझम अँड कल्चर फेस्टिव्हल समिती गोवा आणि श्री नागेश महारुद्र फाउंडेशन, गोवा यांच्यावतीने आयोजित राष्ट्रीय लोक गौरव सन्मान परिषद सन २०२६ लक्षवेधी पुरस्कार वितरण सोहळा रविवारी पणजी येथील कला व संस्कृती संचनालय भवनात पार पडला.यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी पळस्पे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच चंद्रकांत अर्जुन भोईर यांना द ग्रेट छत्रपती शिवाजी महाराज पुरस्काराने अभिनेते अभय खडपकर, जेष्ठ साहित्यिक डॉ उल्हास देशमुख, आमदार रोडोल्फो फर्नांडिस, प्रमोद कामत यांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. दरम्यान, माजी सरपंच चंद्रकांत भोईर यांनी आपल्या २५ वर्षे सरपंच कारकिर्दीत विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले. त्यांच्या कार्यावर प्रेरीत होवून मा.सरपंच चंद्रकांत अर्जुन भोईर यांना अमेरिका इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीने सोशल वर्कमध्ये डॉक्टरेट प्रदान केली आहे.

# गाढी नदीवर पुलाच्या कामाला सुरुवात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहर आणि करंजाडे वसाहतीला जोडणाऱ्या गाढी नदीवर पनवेल महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या ५० कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी पुलाचे काम आता प्रत्यक्ष सुरू झाले आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते या पुलाचे भूमिपूजन यापूर्वीच संपन्न झाले होते, तर सोमवारी करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार यांच्या हस्ते या कामाचा शुभारंभ करण्यात आला.



पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उरणचे आमदार महेश बालदी यांनी नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन केलेल्या पाठपुराव्याला या प्रकल्पामुळे यश आले असून, यामुळे परिसरातील दळणवळण अधिक वेगवान होणार आहे. महानगरपालिकेच्या हद्दीतील भूखंड क्रमांक ५०६, पनवेल बाजूने करंजाडे मलनिस्सारण उदंचन केंद्राजवळ गाढी नदीवर हा नवीन पूल उभारला जाणार आहे. सध्या करंजाडेकडे जाणाऱ्या अस्तित्वातील पुलावर वाहनांची प्रचंड वर्दळ असते, ज्यामुळे नागरिकांना वारंवार वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. विशेषतः पनवेल शहर, करंजाडे आणि वडघर येथील सिडको वसाहतीमधील वाढत्या लोकसंख्येमुळे वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात वाढला आहे. हा नवीन पूल कार्यान्वित झाल्यानंतर ही कोंडी फुटण्यास मोठी मदत होणार आहे.

येत्या काळात लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या संख्येत मोठी वाढ होणार आहे. हे दूरदृष्टीने लक्षात घेऊनच या पुलाचे नियोजन करण्यात आले आहे. या कामाच्या शुभारंभ प्रसंगी भाजपचे विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, नाथा भरवाड, अतिश साबळे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

# पनवेल महानगरपालिका शाळांचे विद्यार्थी रंगले बाल महोत्सवात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांचा अत्यंत आवडता 'बालमहोत्सव' अर्थात विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम नुकताच मोठ्या उत्साहात आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये झाला. या कार्यक्रमास महापौर नितीन पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार कार्यक्रमाचे अयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन उपमहापौर प्रमिला पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.



अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे व उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचा बक्षीस वितरण समारंभ सहाय्यक आयुक्त डॉ. रुपाली माने, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, परीक्षक नयना प्रकाशन यांच्या हस्ते पार पडला.

बाल महोत्सवाच्या निमित्ताने जम्मू - काश्मीरपासून ते कन्याकुमारीपर्यंतच्या विविध लोकपरंपरा, विविध सण-उत्सव आणि सांस्कृतिक वैविध्य दर्शविणाऱ्या गाण्यांवर विद्यार्थ्यांनी आकर्षक नृत्य सादर केले. या कार्यक्रमामध्ये सुमारे ४५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# पनवेल तालुका क्रीडा संकुलामध्ये आऊटडोर जिम साहित्य उपलब्ध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड यांच्या अधिपत्याखाली असलेल्या पनवेल तालुका क्रीडा संकुलामध्ये रायगड जिल्हा नियोजन समितीच्या व्यायामशाळा विकास अनुदान योजनेतून सात लाख रुपये किमतीचे अत्याधुनिक आऊटडोर जिम साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. या साहित्याचे लोकार्पण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते आणि महापौर नितीन पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी, खेळाडूंना उत्तम सोयीसुविधा मिळाव्यात यासाठी शासन कटिबद्ध आहे. लवकरच शासनाच्या विशेष निधीतून या तालुका क्रीडा संकुलाचे संपूर्ण अद्यावतीकरण करण्यात येणार असून, त्याद्वारे अधिक दर्जेदार सुविधा निर्माण करण्याचे नियोजन असल्याचे स्पष्ट केले. खेळाच्या माध्यमातून तरुणांचे आरोग्य सुधारावे आणि त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, हा या उपक्रमामागचा मुख्य उद्देश असल्याचेही त्यांनी नमूद केले.

याच कार्यक्रमात येत्या एप्रिल महिन्यापासून क्रीडा संकुलात समर कॅम्प सुरू करण्यात येणार असल्याचेही जाहीर करण्यात आले. या कार्यक्रमाला नगरसेवक सुमित झुंजारराव, माजी नगरसेविका सारिका भगत, गणेश म्हात्रे, सतीश पाटील, रूपेश नागवेकर यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



# पोयंजे व मोहोपे गावात विविध विकासकामांचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पोयंजे व मोहोपे गावाच्या विकासासाठी विविधा विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला. यामध्ये पोयंजे रेल्वे ब्रीज ते पोयंजे सिमेंट काँक्रिट रस्ता, पोयंजे ते पोयंजेवाडी सिमेंट काँक्रिट रस्ता, पोयंजे ते मोहोपे सिमेंट काँक्रिट रस्ता, पाली पोयंजे ठाकुरवाडी येथे बोरवेल मारण्यात आली. तसेच विविध कामांचे भूमिपूजन करण्यात आले.



या वेळी पनवेल पंचायत समिती सभापती रंजना वास्कर, जिल्हा परिषद सदस्य अनन्या गाताडे, पोयंजे पं.स. सदस्य अस्मिता पाटील, महाराष्ट्र कामगार मजदुर सेल अध्यक्ष तथा उद्योगपती अनंत पाटील, गुळसुंदे पं.स.अध्यक्ष अविनाश गाताडे, पोयंजे पं.स. अध्यक्ष मंगेश लबडे, पनवेल उप तालुका प्रमुख प्रवीण खंडागळे, माजी उपसरपंच प्रवीण भोईर, तानाजी खंडागळे, विस्तार अधिकारी संतोष ठोंबरे, ग्रामसेवक धनंजय निकम, प्रवीण ठाकूर, रविंद्र गायकवाड, रमेश भोईर, राजेश चव्हाण, बूथ अध्यक्ष पंढरी शितकणगे, सामाजिक कार्यकर्ते शशिकांत सोनटक्के, ग्रा पं सदस्य रोहिदास चोरघे, पोयंजे अध्यक्ष जयदास पाटील, जयदास चोरघे, अशोक भोईर, प्रसाद सोनटक्के, दीपक भोईर, भरत गायकर, शरद गायकर, कालूराम आगिवले, पवन गायकर, अंकुश भागीत, मंदार कडव पोयंजे गावातील सर्व महिला वर्ग सर्व समाजसेवक उपस्थित होते.

विशेष म्हणजे पोयंजे गावातील दमदार नेतृत्व करणारे युवा कार्यकर्ते प्रवीण भोईर यांनी मेहनतीने जवळ जवळ २ महिने स्वतः उभे राहून सर्व कामे पूर्ण करून घेतली. त्या बद्दल प्रवीण भोईर यांचे ग्रामस्थ मंडळ पोयंजे यांनी विशेष आभार मानले.

# खारघर परिसरामधील बाउंसिंग बनी कॅफेत आग

**पनवेल : वार्ताहर**

खारघर सेक्टर २३ परिसरातील बाउंसिंग बनी कॅफेमध्ये अचानक लागलेल्या आगीमुळे नुकसान झाले. कॅफेमधील व्हिडिओ गेम्स, वातानुकूलित यंत्रणा आणि आतील सजावटीचा मोठा भाग खाक झाला आहे.



खारघरमधील सेंट्रल पार्कलगत असलेल्या बाउंसिंग बनी नावाचे कॅफे आणि रेस्टॉरंट आहे. या कॅफेत व्हिडिओ गेमसह रेस्टॉरंट असल्यामुळे नागरिक, तसेच गेम खेळणाऱ्या तरुणाईची गर्दी असते. अग्निशमन केंद्राकडून मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सायंकाळी कॅफे सुरू असताना अचानक धूर येऊ लागल्याचे कर्मचाऱ्यांच्या लक्षात आले. काही क्षणातच आगीने रुद्र रूप धारण केले. कॅफेमध्ये मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रॉनिक उपकरणे असल्यामुळे आग वेगाने पसरली.

या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या तत्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन जवानांनी तत्परतेने आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले आणि काही वेळातच आग नियंत्रणात आणली. प्राथमिक तपासानुसार, शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# पनवेल कोळीवाड्यातून एकविरा देवीच्या पालखीचे कार्ला गडाकडे प्रस्थान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आई एकविरा देवीची यात्रा येत्या २६ तारखेला मोठ्या उत्साहात साजरी होणार असून, यंदा या यात्रेतील पालखीचा मानाचा बहुमान पनवेल कोळीवाड्याला मिळाला आहे. या पार्श्वभूमीवर, रविवारी पनवेल येथील कोळीवाड्यातून आई एकविरा देवीच्या पालखीचे कार्ला गडाकडे अत्यंत भक्तीमय वातावरणात प्रस्थान झाले.

या मंगलप्रसंगी भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालीकेचे महापौर नितीन पाटील यांनी पालखी सोहळ्याला भेट देऊन आई एकविरा देवीचे मनोभावे दर्शन घेतले. पालखी प्रस्थानाच्या वेळी संपूर्ण कोळीवाडा परिसरात पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि मआई एकविरा देवीचा उदो उदोफच्या जयघोषात भाविकांनी पालखी सोहळा साजरा केला.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित कोळी बांधवांना आणि भाविकांना यात्रेच्या शुभेच्छा दिल्या. दरवर्षीप्रमाणे यंदाही आई एकविरा देवीच्या आशीर्वादाने हा सोहळा निर्विघ्नपणे पार पडेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. या सोहळ्याला नगरसेवक सुमित झुंजारराव, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, हरिश्चंद्र भगत, रूपेश नागवेकर, अपूर्व ठाकूर आदी पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

# नगरसेविका डॉ. अस्मिता घरत यांच्या जनता दरबाराला प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्यातील विविध भागांत नगरसेवक आणि लोकप्रतिनिधींकडून नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी 'जनता दरबार' किंवा 'जनसंपर्क अभियानाचे' आयोजन केले जात आहे. या उपक्रमांमधून स्थानिक प्रश्न, नागरी सुविधा आणि प्रशासकीय अडचणींवर तत्काळ उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला जातो. याच अनुषंगाने पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग १७ मध्ये नगरसेविका डॉ. अस्मिता जगदीश घरत यांनी नुकताच 'जनता दरबार' आयोजित करून नागरिकांच्या समस्या थेट जाणून घेतल्या आहेत.

नगरसेविका अस्मिता जगदीश घरत यांनी रविवारी (दि.२२ मार्च) त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात घेतलेल्या पहिल्याच जनता दरबाराला चांगला प्रतिसाद मिळाला. यावेळी विविध खात्यांसंदर्भात असलेल्या १०० हून अधिक तक्रारदारांच्या तक्रारी स्वतः नगरसेविका अस्मिता घरत यांनी जाणून घेत, त्या सोडविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करून सोडविण्यावर प्रामाणिक लक्ष देणार असल्याचे त्यांनी आश्वासित केले.



सकाळी ११ वा. सुरू झालेला जनता दरबार दुपारी ०२ वाजेपर्यंत सुरू होता. यात नागरी सेवा सुविधांवर विशेष लक्ष देण्यात आले. विशेष म्हणजे वसाहतीमध्ये होत असलेला दूषित पाणीपुरवठा, महापालिका कर शहरात गर्दीच्या व वर्दळी ठिकाणी हायमास्ट उभारणे, सेक्टर १३ ए टाईप वसाहतीमधील गटार दुरुस्ती, पदपथावरील अतिक्रमण, सेक्टर १२ १३, १४ व १७ सह नवीन पनवेल परिसरात परप्रांतीयांच्या वाढत्या अवैध हातगाड्या, रास्त धान्य विक्री दुकान सेक्टर १३ ए टाईप मध्ये सुरु करणे, नवीन पनवेल पिल्लेज कॅम्पस जवळील उद्यानातील रनवेवरील पेव्हरब्लॉकची दयनीय अवस्था, उद्यानातील शौचालयातील पाणी समस्या, खाऊ गल्लीतील हातगाड्यां वरील स्वच्छता, पंचशील नगरातील बौद्धविहार दुरुस्ती, नागरी वसाहती मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, महानगरपालिका वसाहतीत कीटकनाशक फवारणी, मालमत्ता कर, शालेय मैदाना वर खेळविले जात असलेले क्रिकेट व त्यापासून होणारे वायू प्रदूषण तसेच ई१ से.१४ परिसरातील रस्त्यांवर बसविलेले पेव्हरब्लॉक दुरुस्ती करणे, ड्रेनेज लाईनसाठी टाकलेली पाईपलाईन यामुळे रस्त्यांची झालेली दुरावस्था यासंदर्भात नागरिकांच्या सर्वाधिक तक्रारी होत्या.

यावेळी प्रत्येक तक्रारदाराबरोबर नगरसेविका अस्मिता घरत यांनी चर्चा करून प्रश्न जाणून घेतले. आलेल्या तक्रारदारांचे अर्ज संबधित विभागांचे प्रमुख यांच्याकडे पाठविण्यात येणार असून लवकरच योग्य ती कार्यवाही होईल, असे यावेळी उपस्थितांना आश्वासित करण्यात आले.

# विसपुते कॉलेजमध्ये बीएड, एमएड, सीईटी मार्गदर्शनपर वेबिनार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये बी.एड. व एम.एड. अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री. बापुसाहेब डी.डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन, नवीन पनवेल तर्फे महाविद्यालयाच्या प्राचार्य ॲड. डॉ. सीमा कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयक्यूएसी अंतर्गत १७ ते २१ मार्च २०२६ दरम्यान पाच दिवसीय महाराष्ट्र बी.एड. व एम.एड. सीईटी मोफत वेबिनार शृंखला यशस्वीरित्या आयोजित करण्यात आली.

या वेबिनारच्या माध्यमातून सीईटी २०२६ ची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षाभिमुख, सखोल आणि मार्गदर्शक असे विविध सत्रांद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सीमा कांबळे, उपप्राचार्य डॉ. विनायक लोहार, डॉ. नेहा म्हात्रे व डॉ. प्रितेश वाढे यांनी विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त अशी सत्रे घेतली.

पाच दिवस चाललेल्या या वेबिनारमध्ये सीईटी परीक्षेचे स्वरूप, प्रक्रिया, अभ्यासक्रम तसेच संदर्भग्रंथ याबाबत तज्ञ मार्गदर्शन करण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी आत्मविश्वास आणि योग्य दिशा मिळाली. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाची भूमिका बजावली. वेबिनारचे सुत्रसंचालन भूमी म्हात्रे व रविना म्हात्रे यांनी केले. तसेच एमएडच्या विद्यार्थीनी प्रोमिता नाडू यांनी सहभागी विद्यार्थ्यांशी आपला सीईटी परीक्षेचा अनुभव शेअर करून त्यांना प्रेरित केले.

या उपक्रमाबद्दल आदर्श शैक्षणिक समूहाचे चेअरमन धनराज विसपुते व संचालिका संगीता विसपुते यांनी महाविद्यालयाचे विशेष कौतुक केले.


### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त

# 'निष्पाप' नाट्यप्रयोगला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दानशूर व्यक्तिमत्व आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला मुंबई मराठी पत्रकार संघ प्रस्तुत 'निष्पाप' या नाटकाचा विशेष प्रयोग उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडला.

पनवेल येथील आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे आयोजित या प्रयोगाला प्रमुख मान्यवर म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख व त्यांच्या सुविद्य पत्नी वैशाली देशमुख, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष व नाटकाचे निर्माते संदीप चव्हाण, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन तसेच नाट्यप्रेमी नागरिकांची मोठी उपस्थिती लाभली. अमृत महोत्सव वर्षनिमित्त यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा मुंबई मराठी पत्रकार संघाच्यावतीने सत्कार करण्यात आला.



चोवीस तास बातम्यांच्या जगात वावरणाऱ्या पत्रकारांच्या संवेदनशीलता आणि सर्जनशीलतेला रंगभूमीवर योग्य व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने मुंबई मराठी पत्रकार संघाने पहिल्यांदाच ६४व्या राज्य नाट्य स्पर्धेत सहभाग नोंदवला आणि पदार्पणातच दोन पुरस्कार पटकावण्याचा मान मिळवला आहे. मुंबई मराठी पत्रकार संघ प्रस्तृत या नाटकाने पत्रकारांच्या संवेदनशीलतेचा आणि अंतर्मनातील संघर्षाचा प्रभावी आविष्कार रंगमंचावर साकारला.

संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण निर्मित या नाटकाचे लेखन प्रा. दिलीप परदेशी यांचे असून दिग्दर्शन गुरुदत्त लाड यांनी केले आहे. प्रमुख भूमिकेत ज्येष्ठ पत्रकार देवदास मटाले आणि स्वाती घोसाळकर यांनी प्रभावी अभिनय सादर केला. तसेच गुरुदत्त लाड, प्रशांत चिडे, रश्मी महांबरे, सिद्धेश शिगवण आणि सुरेश ठुकरुळ यांनीही आपल्या भूमिकांद्वारे नाटकाला समर्थ साथ दिली.

# एटीएम कार्डची हातचलाखी करून फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

पैसे काढण्या करीता गेलेल्या व्यक्तीची दोन अनोळखी इसमांनी हात चलाखी करून एटीएम कार्डाची हातचालाखी करून ४५ हजार रुपयाची रक्कमेची फसवणूक केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

चिपळे येथे राहणारे अरूप मित्रा हे मायाबार जवळील एचडीएफसी एटीएममध्ये पैसे काढण्या करीता गेले असता दोन अनोळखी इसमांनी हात चलाखी करून त्यांचे ॲक्सीस बँकेच्या एटीएम कार्डाची हातचालाखी करून ४५ हजार रुपयांची फसवणूक केली. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# उसाच्या रसाला मागणी वाढली

**उरण : वार्ताहर**

उन्हाला वाढला की उसाच्या दुकानातील रस पिणाऱ्यांची गर्दी वधु लागली आहे. उसाचा रस आरोग्यदायी असल्याने पिनार्यांची संख्याही खुपच असते.

उसाचा रस प्यायल्याने कॅलरीज अणि साखरेचे सेवन वाढू लागते, उसाच्या रसामुळे शरीराला त्वरित उर्जा आणि हायड्रेशन मिळते. उन्हाळ्यात उसाचा रस पिण्यास अनेकांची पसंती मिळते.



उरण शहरातठीक -ठिकाणी उसाच्या रसाचे चरखे दिसू लागले आहेत. उसाच्या रसाला दिवसेंदिवस मागणी वाढत चालली आहे. उरण शहरात वाणी आळी, उरण राजपाल नाका, कामगार वसाहत, आनंद नगर, एन.आय.हायस्कूल इत्यादी ठिकाणी उसाचे चरखे पहावयास मिळत आहे. जसजसे उष्णतेचे प्रमाण वाढते त्या प्रमाणे दुपारच्या वेळेस उसाचा रस पिणाऱ्यांची संख्या वाढत जाते.

उसाचा रस आरोग्याला चांगले, फायदेशीर असल्याने दिवसेन -दिवस पिणार्यांची संख्या वाढत आहे फुल ग्लास २० रुपये दराने आम्ही विकतो. गेली ४० वर्षा पासून आम्ही विकत आहोत, असे जय भवानी रसवंती गृहचे ज्ञानेश्वर शिवराम दामगुडे यांनी सांगितले.

## संपादकीय

# पीडितांना न्याय मिळावा

संत आणि सुधारकांची भूमी तसेच देशातील आघाडीचे पुरोगामी राज्य अशी ओळख असलेल्या महाराष्ट्राला नाशिकमधील लिंगपिसाट भोंदूबाबा अशोक खरात याच्या कारनाम्यांनी मोठा धक्का बसला आहे. खरातचे विकृत कारनामे रोज उजेडात येत असून कुणाकुणाशी असलेल्या घनिष्ठ संबंधांमुळे या भोंदूबाबाला समाजात प्रतिष्ठा मिळाली ते समोर यायलाच हवे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी विशेष तपास पथकाची स्थापना केली असून, ज्याचा कुणाचा या प्रकरणाशी दुरान्वयानेही संबंध असेल, त्यालाही सोडले जाणार नाही असेही त्यांनी म्हटले आहे. पुन्हा महाराष्ट्रात असे घडणार नाही याची दक्षता या प्रकरणातून घेतली गेली पाहिजे.

**एखाद्या भोंदूबाबाकडून झालेल्या लैंगिक वा अन्य स्वरुपाच्या शोषणाचे प्रकरण उघडकीस येण्याची ही काही देशातील पहिली वेळ नव्हे. सर्व धर्मीय समाजांमध्ये सर्वसामान्यांच्या हतबलतेचा गैरफायदा उठवून असे शोषण झाल्याचे दर्शवणाऱ्या घटना यापूर्वीही उघडकीस आल्या आहेत. कुठल्या तरी समस्यांनी नाडलेल्या असहाय स्त्रियांच्या श्रद्धेचा व आशाआकांक्षांचा गैरफायदा घेऊन त्यांचे लैंगिक शोषण करणारे बाबा वा बापू अखेरीस कायद्याच्या कचाट्यात अडकलेले यापूर्वीही दिसले आहेत. त्याच मालिकेत आता या अशोक खरात नामक विकृताची भर पडली आहे. भोंदूगिरी आणि शोषणासोबतच त्याने कोट्यवधींची माया व मालमत्ता जमवल्याचेही समोर आले आहे. त्याच्याशी असलेली जवळीक उघड झाल्याने रुपाली चाकणकर यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष पदाचा राजीनामा देणे भाग पडले आहे. राज्यातील महिलांचा शोषणापासून बचाव करण्याची व पर्यायाने त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी असलेल्या रुपाली चाकणकर या विकृत भोंदूबाबा अशोक खरातची पाद्यपूजा करताना दिसल्या. आपल्याला त्याच्या खाजगी आयुष्याची व आता उघडकीस आलेल्या कारनाम्यांची कल्पना नव्हती असा पवित्रा आता चाकणकर यांनी घेतला आहे. निव्वळ खरातसोबत फोटो आहे म्हणून कुणाला दोषी मानले जाता कामा नये अशी मागणीही आता होऊ लागली आहे. परंतु खरात ज्या पद्धतीने भीती निर्माण करून, औषधे मिसळलेले पाणी प्यायला देऊन राजरोस अनेक महिलांचे लैंगिक शोषण करत होता, त्याची व्याप्ती पाहता त्याला मोठे करण्यात ज्यांचा हातभार लागला त्यांच्याही अंगाशी हे प्रकरण येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याच्याकडे कायम अत्यंत महागड्या गाड्यांमधून सेलेब्रिटी, राजकीय नेतेमंडळी व अन्य बडी धेंडे येत असत असे सांगितले जाते आहे. बडी नेतेमंडळी व अधिकारी यांच्याशी घनिष्ठ संबंध असल्यामुळे तो ही दुष्कृत्ये इतकी बिनबोभाट करू शकला का, याचे उत्तर तपासातूनच मिळू शकेल. त्याच्याविरोधात तक्रार करण्याचा प्रयत्न कुणा पीडितेकडून आधीही झाला होता का, कुणाच्या दबावाने हे प्रकरण तेव्हा दडपले गेले याचेही तपशील आता उघडकीस येत आहेत. त्याच्या दुष्कर्मांना ही अशी मदत करणारे कोण होते हे समोर यावेच लागेल. शोषण करणाऱ्या भोंदूबाबांची काही प्रकरणे यापूर्वी चव्हाट्यावर येऊनही सुशिक्षित स्त्रिया कुठल्या प्रकारच्या हतबलतेतून अशा विकृताच्या मानसिक दबावाला बळी पडतात व आपले लैंगिक शोषण करू देतात असा प्रश्नही आता विचारला जातो आहे. की, विश्वास संपादन करून हा लिंगपिसाट मोठ्या हुशारीने त्यांना जाळ्यात ओढत होता याचेही तपशील तपासातून पुढे येतील. पुन्हा महाराष्ट्रात असे घडणार नाही याची दक्षता घेतली जाईल अशी शिक्षा या लिंगपिसाटाला व्हावी एवढे मात्र नक्की.**

# उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी दाणा-पाण्याची व्यवस्था



मुंबईसह आजूबाजूच्या शहरात ३५ ते ४० अंशांपर्यंत तापमान पोहचल्याने माणसासह प्रत्येक जीव हैराण झाला आहे. म्हणूनच घराच्या अंगणात, गच्चीवर प्राणी-पक्ष्यांसाठी पाणी ठेवण्याचे आवाहन पर्यावरण प्रेमींकडून करण्यात येत आहे.

एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासूनच सर्वच ठिकाणी तीव्र उष्णतेच्या झळा लागत आहेत. अशातच अवकाळी पावसाने काही जिल्ह्यात हजेरी लावल्याने तापमानात चढउतार दिसून येत आहे. उन्हाळ्यात ठराविक वेळेनंतर थंड पाणी पिऊन आपण स्वतःला उन्हापासून वाचविण्याचा प्रयत्न करत असतो. असेच काहीसे प्राणी-पक्ष्यांचेही आहे. त्यांनाही पाण्याची आवश्यकता आहे. पाण्याअभावी अनेक प्राणी-पक्ष्यांचा मृत्यू होतो. निसर्गाच्या साखळीमध्ये प्राणी-पक्ष्यांना देखील सर्वाधिक महत्त्व आहे. यासाठी एक जबाबदार नागरिक, सामाजिक भान, माणुसकी म्हणून आपण प्राणी-पक्ष्यांसाठी, त्यांची तहान भागवण्यासाठी, त्यांचा जीव वाचवण्यासाठी उन्हाळ्याच्या दिवसात तळमळीने प्रयत्न केले पाहिजे. अनेक पर्यावरणप्रेमी, सामाजिक संस्था आज पुढे येऊन काम करत असून आपण देखील घराच्या खिडकीत, अंगणात, इमारतीच्या गच्चीवर प्राणी-पक्ष्यांसाठी पाणी ठेवणे गरजेचे आहे.

उष्णतेमुळे होणारा परिणाम हा फक्त माणसांवरच न होता पक्षी आणि प्राणी यांच्यावरही होत असल्याचे दिसते आहे. परळ येथील बाई सक्करबाई दिनशॉ पेटिट हॉस्पिटल फॉर ॲनिमल्सने दिलेल्या माहितीनुसार, मार्चच्या तुलनेत एप्रिलमध्ये पक्षी आणि प्राण्यांमध्ये निर्जलीकरण होण्याच्या घटनांमध्ये ३० ते ४० टक्क्यांची वाढ झाली आहे. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात ३० विविध प्राणी आणि पक्ष्यांना रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. दाखल केलेल्या प्राण्यांमध्ये दोन कासवे, कबूतरे, गरूड, घुबडे आणि कावळे यांचा सामावेश आहे.

वाढत्या शहरीकरणामुळे आणि हवामान बदलामुळे चिमण्यांसह इतर पक्ष्यांची संख्या चिंताजनक प्रमाणात घटत आहे. या पार्श्वभूमीवर, कडाक्याच्या उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी दाणा-पाण्याची सोय करण्यासाठी जिल्ह्यातील अनेक संस्था, संघटना आणि नागरिक पुढाकार घेत आहेत. अनेक जण भूतदया दाखवताना दिसत आहेत.

एक वाटी चिऊसाठी या उपक्रमाची सुरुवात रोहा वनविभाग कार्यालय आणि तहसील कार्यालय येथे एक वाटी पाणी ठेवून व आवाहन पत्र वितरित करून झाली. त्यानंतर, स्वयंसेवक आणि कार्यकर्त्यांनी शहरभर घराघरांत जाऊन तब्बल ५०० वाट्या आणि जनजागृती पत्रके वाटली. यावेळी नागरिकांना आपल्या घराच्या आजूबाजूला पक्ष्यांसाठी पाणी ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. शासकीय कार्यालयांमध्ये व घराघरांत जनजागृती करण्यात आली.

**खबरबात**
**धम्मशील सावंत**

एक वाटी चिऊसाठी या उपक्रमात अनिकेत पाडसे, दिनेश शिर्के, प्रथमेश राक्षिकर, प्रमोद खांडेकर, नंदकिशोर राक्षे, दत्तात्रेय शेडगे, संकेत हजारे, दत्ता वाघमारे आणि इतर स्वयंसेवकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांनी लोकांमध्ये पक्ष्यांविषयी संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी घरोघरी संपर्क साधला.

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील वांगणी गावातील संकल्प मित्रमंडळ आणि उत्कर्ष मित्रमंडळ या दोन संस्था गेल्या काही वर्षांपासून उन्हाळ्यात पशुपक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था करत आहेत. ताम्हिणी घाट आणि भिसे खिंड येथेही पक्ष्यांसाठी पिण्याचे पाणी ठेवले जाते. जलस्रोत कोरडे पडल्यावर पक्ष्यांसाठी हे पाणी संजीवनी ठरते. तर सुधागड तालुक्यातील जांभूळपाडा येथील पशुपक्षी प्रेमी सचिन मजेठिया हे गेली अनेक वर्षे मोकाट जनावरे आणि पक्ष्यांसाठी अन्न-पाण्याची व्यवस्था करत आहेत. त्यांनी दुकानाबाहेर छोटा हौद बनवून घेतला आहे, जिथे चिमणी, कावळे आणि इतर पक्षी दाण्यापाण्यासाठी येतात.

**पक्षांसाठी थंडगार पाणी**

चिमणी आणि इतर पक्ष्यांसाठी थंडगार पाणी मिळावे यासाठी अनेकजण मातीची भांडी बनवून परसात आणि झाडांवर लावत आहेत. पालीतील हभप महेश पोंगडे महाराज, पुई-सिद्धेश्वर येथील तरुण गणेश शिंदे, फणसवाडी येथील निलेश शिंगरे यांनी हा अनोखा उपक्रम राबविला आहे. पालीतील अमित निंबाळकर यांनी आपल्या नर्सरीत आणि घराजवळ झाडांवर चिमण्यांसाठी घरटी बनवून पाण्याची व्यवस्था केली आहे.

**चिमण्यांचे संवर्धनः काळाची गरज**

गेल्या काही वर्षांत चिमण्यांच्या संख्येत मोठी घट झाली आहे. पर्यावरणातील बदल, मोबाईल टॉवर्समधून निघणारे रेडिएशन आणि झाडांची कत्तल यामुळे चिमण्यांचे अधिवास नष्ट होत आहेत. या संदर्भात निसर्ग वन्यजीव संवर्धन संस्थेने नागरिकांना पक्ष्यांसाठी पाणी आणि खाद्य ठेवण्याची सवय लावण्याचे आवाहन केले आहे.

**चिमण्यांना सुरक्षित घर**

पालीतील शंतनु लिमये या युवकाने मानवी वस्तीत येणाऱ्या चिमण्यांसाठी निवारा आणि दाण्यापाण्याची व्यवस्था केली आहे. त्यांनी घराभोवती चिमण्यांसाठी खास घरटी बनवली आहेत, जिथे अनेक चिमण्या सहकुटुंब राहतात आणि प्रजनन करतात.

**नागरिकांची जागृती**

एक वाटी चिऊसाठी या उपक्रमाचे आयोजक दिनेश शिर्के यांनी नागरिकांना हा उपक्रम केवळ उन्हाळ्यापुरता मर्यादित न ठेवता, वर्षभर पक्ष्यांसाठी पाणी आणि खाद्य ठेवण्याची सवय लावण्याचे आवाहन केले आहे. पालीतील शिक्षक जनार्दन भिलारे यांनी आपल्या परसात पक्ष्यांसाठी पाणी आणि खाद्य ठेवले आहे.

**पाचोळा न जाळण्याचे आवाहन**

उन्हाळ्याच्या दिवसात झाडांची पानगळ होत असते. हा पालापाचोळा झाडाखाली साचून असतो. पालापाचोळ्याखाली किडे, गांडूळ तयार होतात. ते खाण्यासाठी पक्ष्यांना मेजवानी असते. बऱ्याच वेळा हा कचरा झाडून जाळला जातो. पण हा कचरा जाळू नका व शक्यतो एका ठिकाणी जमा करून ठेवा, असे आवाहन पक्षीमित्रांनी केले आहे. एकतर धुरामुळे प्रदूषण होते शिवाय पक्ष्यांनाही ते त्रासदायक होते. या कचऱ्याखाली मिळणाऱ्या नैसर्गिक खाद्यापासून पक्षी वंचित राहतात.

**अशी करता येईल व्यवस्था!**

घरी सावलीच्या ठिकाणी व पक्ष्यांना मुक्त वातावरण मिळेल अशा ठिकाणी मातीच्या पसरट भांड्यात पाणी ठेवावे. पक्ष्यांना आंघोळही करता येईल, असे भांडे असावे.पाण्यासोबतच अन्नाची व्यवस्थाही करता येईल. विशेषतः ज्वारी, बाजरी, गहू, तांदूळ आदी धान्याचा भरडा उत्तम ठरेल. यासह भाताचे शित व पोळ्यांचे बारीक तुकडे करून ठेवता येतील.पाणी आणि धान्यासाठी प्लास्टिकच्या बाटल्या, बरण्या, तार, दोरी, मातीचे भांडे आदींचा वापर करून फीडर तयार करता येईल. असे कृत्रिम फीडर आता बाजारातही उपलब्ध आहेत.

मातीचे पात्र बांधणे शक्य नसल्यास नारळाच्या करवंटीचा वापर करु शकतो. झाडावर बांधणे शक्य नसेल तर झाडाखाली, सावली राहील तिथे पाणी व धान्य ठेवावे.

उद्यानात जाता-येताना आवर्जून सोबत पाणी घेऊन जा आणि झाडांना टांगलेल्या पात्रात ओता. घरून बाहेर निघताना सोबत पाणी ठेवा जेणेकरून शक्य होईल, त्या पात्रात पाणी भरता येईल.

पक्ष्यांचे अस्तित्व टिकवण्यासाठी लोकांमध्ये जागृती निर्माण होत आहे. नागरिकांच्या सहभागानेच पर्यावरणाचे संरक्षण आणि जैवविविधतेचे संवर्धन शक्य आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# ट्रूकॉलरवरून अकाउंट, नंबर कसा डिॲक्टिवेट कराल?

स्मार्टफोन वापरकर्त्यांसाठी ट्रूकॉलर एक सोयीस्कर ॲप बनले आहे. ट्रूकॉलर युजर्सना अज्ञात नंबर ओळखण्यास आणि स्पॅम कॉल ब्लॉक करण्यात मदत करते.



अनोळखी कॉलची ओळख पटवून देणे हे ट्रूकॉलरचे प्रमुख वैशिष्ट्य आहे, पण काही वापरकर्त्यांना त्यांच्या प्रायव्हसीची चिंता असते, तर या युजर्सना आता चिंता करण्याची गरज नाही. तुम्हाला जर ट्रूकॉलरवरील तुमचे अकाउंट डिलीट करायचे असेल किंवा तुमचा नंबर तुम्हाला काढून टाकायचा असेल तर सोपी प्रोसेस फॉलो करावी लागेल. अँड्रॉइड आणि आयफोन वापरकर्ते कशाप्रकारे ट्रूकॉलर ॲपमधील स्वतःचे अकाउंट (नाव) डिलीट व नंबर काढून टाकू शकतात, याविषयी आपण या लेखातून जाणून घेऊया...

**अँड्रॉइड फोनमधून ट्रूकॉलर अकाउंट कसे डिलीट करायचे?**

तुमच्या फोनमधील ट्रूकॉलर ॲप ओपन करा. डावीकडे असणाऱ्या तीन डॉटवर टॅप करा. त्यानंतर सेटिंग्समध्ये जा. दिलेल्या पर्यायांमधून प्रायव्हसी सेंटर शोधा. त्यानंतर अकाउंट डिक्टिव्हेट या पर्यायावर क्लिक करा. तुमच्या स्क्रीनवर दिसणारा संदेश वाचा आणि कन्फर्म बटणावर क्लिक करा. आयफोनवरून ट्रूकॉलर अकाउंट कसे डिलीट करायचे?

**आयफोन वापरकर्त्यांसाठी त्यांचे ट्रूकॉलर अकाउंट डिलीट करण्यासाठी या स्टेप्स फॉलो करा**

तुमच्या फोनमध्ये असणारा ट्रूकॉलर ॲप उघडा. नंतर उजव्या कोपऱ्यात असणाऱ्या गियर चिन्हावर टॅप करा. अबाउट ट्रूकॉलरवर क्लिक करा. नंतर खाली स्क्रोल करा आणि अकाउंट डिक्टिव्हेटवर टॅप करा. तुमच्या स्क्रीनवर दिसणारा संदेश वाचा आणि कन्फर्म बटणावर क्लिक करा.

**तुमचा फोन नंबर ट्रूकॉलरमधून कसा काढायचा?**

ट्रूकॉलरच्या अधिकृत वेबसाइटवर जा. अनलिस्ट फोन नंबर पेजवर नेव्हिगेट करा. देशाच्या कोडसह तुमचा फोन नंबर लिहा. तुम्हाला तुमचे ट्रूकॉलर अकाउंट डिक्टिव्हेट करायचे आहे, या पर्यायावर क्लिक करा. त्यानंतर कॅप्चा कोड प्रविष्ट करा. त्यानंतर दिलेल्या पर्यायातून 'अनलिस्ट'वर टॅप करा. या स्टेप्स फॉलो करून तुमच्या डिव्हाइसवरून तुमचे ट्रू कॉलर अकाउंट डिलीट करू शकता आणि तुमचा फोन नंबर ट्रू कॉलर डेटाबेसमधून अनलिस्टेड असल्याची खात्री करून घेऊ शकता.

# प्रसिद्ध लेखक व.पु. काळे



**निमित्त**

वसंत पुरुषोत्तम काळे म्हणजेच व.पु. यांचा जन्म २४ मार्च १९३२ रोजी झाला. ते मराठी भाषेतील लेखक, कादंबरीकार, कथाकथनकार होते. त्यांचे विचार, साहित्य रसिकांमध्ये खूप प्रसिद्ध आहेत. हसता हसता डोळ्यांत पाणी आणणारा असा त्यांचा विनोद असे. विशेषतः तरुणाईच्या मनावर 'वपुं'नी आपल्या लेखनाच्या माध्यमातून गारूड केले. जगणे हीसुद्धा एक कला आहे, ती आपण अवगत करायला हवी, असा संदेश ते अगदी सहज देऊन जात असत.


व. पु. या दोन अक्षरांवर तमाम रसिक अजूनही प्रेम करत आहेत. त्यांचे विचार आदानप्रदान करीत आहेत. 'वपु' मुंबई महापालिकेत होते. पेशाने वास्तुविशारद होते, पण वास्तू साकारताना त्यांनी किती सुंदर सुंदर पुस्तके आपल्या मराठी मातृभाषेत लिहिली याला तोड नाही. 'वपुं'चे मराठी लिखाण सामान्य माणसाच्या जीवनाला भिडणारे, समृद्ध करणारे आहे. आपण सारे, अर्जुन, गुलमोहर, गोष्ट हातातली होती, घर हरवलेली माणसं, दोस्त, माझ्या माझ्यापाशी, मी माणूस शोधतोय, वन फोर द रोड, रंग मनाचे, माणूस, वपुर्झा, हुंकार असे पत्रसंग्रह, ललीतप्रकार खूपच प्रसिद्ध आहेत तसेच तप्तपदी ठिकरी व वाट एकटीची यासारख्या कादंबऱ्या खूपच गाजल्या.

आपल्या लिखाणातून जगण्याचं तत्त्वज्ञान सोप्या पण रंजक पद्धतीने सांगणारे थोर साहित्यिक म्हणजे व.पु. काळे. त्यांचा वाचकविश्वात स्वतंत्र असा संप्रदाय आहे. 'वपुं'नी ६०पेक्षा जास्त पुस्तकांचे लिखाण केलं. त्यातील पार्टनर, वपूर्झा ही वाट एकटीची यांचे कथाकथन त्यांनी स्वतः केलं. या कथाकथनाला प्रेक्षकांनी भरपूर दाद दिली आणि ऑडिओ कॅसेटमधून घराघरात पोहचणारे 'वपु' पहिले लेखक ठरले. पेशाने आर्किटेक्ट असणारे 'वपु' इमारतींच्या आराखड्याचे रेखन करण्यापेक्षा लेखन करू लागले आणि मराठी साहित्याला एक थोर साहित्यिक लाभला.

'वपुं'चं लिखाण चौफेर होतं. कथा, ललित, नाटक, वैचारिक, चरित्र, आत्मचरित्र्य असे सर्व लेखन प्रकार त्यांनी हाताळले. लेखनातील विशेष बाब म्हणजे कथा संपताना कथेत अचानक येणारा ट्विस्ट. त्यांच्या कथा जिवंत माणसांच्या, नातेसंबंधांच्या, स्वैर वेड्या मनाचे विविध कंगोरे अधोरेखित करणाऱ्या असत. 'वपुं'ची कथा वाचताना डोळ्यांसमोर कथेचे कथानक तरळते. लेखकाला कथा आपली वाटावी असं 'वपु' लिहीत असत. त्यांच्या पार्टनर, झोपाळा, आपण सारे अर्जुन, ऐक सखे, चतुर्भुज, काही खरं काही खोटं अशा अनेक पुस्तकांवर, त्यांच्या कादंबऱ्या आणि कथांवर वाचकप्रियतेची मोहोर उमटली आहे. त्यांचे 'पार्टनर' हे पुस्तक भरपूर लोकप्रिय आहे. सर्व लेखनाचे, कथाकथनाचे श्रेय त्यांनी त्यांच्या पुण्याच्या चिंचोरे गुरुजींना दिले होते.

व.पु. काळेंना महाराष्ट्र शासनाचा उत्तम लेखकाचा सन्मान, पु.भा.भावे पुरस्कार, फाय फाऊंडेशनचा पुरस्कार तसेच अमेरिकेत आयोजित करण्यात आलेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद बहाल केले गेले. अशा या थोर लेखकाचे २६ जून २००१ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# रोज सकाळी उपाशीपोटी पाणी पिण्याचे फायदे

पाणी हे जीवन आहे, असं का म्हटलं जातं याची कल्पना सगळ्यांनाच आहे. पृथ्वीवरील कोणताही जीव पाण्याशिवाय जगू शकत नाही. रोज सकाळी झोपेतून उठल्यावर पाणी पिण्याचे शरीराला काय फायदे मिळतात हे आम्ही तुम्हाला सांगणार आहोत. यावरून पाण्याचं महत्त्व पुन्हा एकदा तुम्हाला कळेल.

**किडनी-लिव्हर डिटॉक्स**



किडनी जर रोज व्यवस्थित साफ झाली नाही तर शरीरात अनेक विषारी तत्व तसेच जमा होतील. ज्यामुळे किडनी डॅमेज होईल आणि इतरही अनेक समस्या होतील. अशात किडनी साफ करण्यासाठी म्हणजे डिटॉक्स करण्यासाठी रोज सकाळी उपाशीपोटी पाणी प्यायला हवं. किडनीसोबतच लिव्हर निरोगी ठेवण्यासाठी आणि डिटॉक्स करण्यासाठी सुद्धा सकाळी झोपेतून उठल्यावर उपाशीपोटी पाणी पिणं महत्वाचं ठरतं.

**मेटाबॉलिज्म बूस्ट होतं**

रोज सकाळी उपाशीपोटी पाणी प्यायल्यानं शरीराचं मेटाबॉलिज्म बूस्ट होतं. यामुळे पचनक्रिया सुधारते आणि कॅलरी अधिक जळतात, ज्यामुळे तुम्हाला वजन लवकर कमी करण्यास मदत मिळते.

**डोकेदुखी-अंगदुखी होईल दूर**

जपानी मेडिकल सोसायटीनुसार सकाळी उपाशीपोटी पाणी प्यायल्यानं डोकेदुखी, अंगदुखी, हृदयाचे आजार, वाढतं वजन, अस्थमा, टीबी, किडनी आणि लघवीच्या आजारांचा धोका कमी होतो.

**त्वचा क्लीन होते**

शरीर आतून साफ करण्यासाठी आणि निरोगी ठेवण्यासाठी रोज सकाळी पाणी पिणं गरजेचं आहे. रोज सकाळी उपाशीपोटी पाणी प्यायल्यास त्वचेवर याचा प्रभाव दिसून येतो.

**डिहायड्रेशन दूर होतं**

शरीरात पाण्याची कमतरता झाली की, चक्कर येणे, कमजोरी जाणवणे, वजन कमी होणे अशा अनेक समस्या होतात. अशा अनेक समस्या टाळण्यासाठी रोज सकाळी तर पाणी प्यावंच सोबतच दिवसभर भरपूर पाणी प्यावं.

**ऊर्जा वाढते**

सकाळी उपाशीपोटी पाणी पिऊन दिवसाची सुरुवात केल्यास शरीराची ऊर्जा वाढते. त्यामुळे दिवसभर वेगवेगळी कामे करण्यास तुम्हाला मदत मिळते.

## खासदार धैर्यशील पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त

# मोफत महाआरोग्य शिबिर

**पेण : प्रतिनिधी**

राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून नगरसेविका सौ पल्लवी प्रसाद कालेकर यांच्या पुढाकाराने व डॉ.जी. डी. पोल फाउंडेशन आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज व रुग्णालय, खारघर-नवी मुंबई यांच्या सहकार्याने पेण शहरात नागरिकांसाठी भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



नागरिकांच्या आरोग्याची काळजी लक्षात घेऊन हे विशेष शिबिर राबविण्यात आले. या शिबीरामध्ये ३५२ शिबीरार्थीनी लाभ घेतला शिबीराचे उद्घाटन नगराध्यक्ष प्रितम पाटील यांच्या हस्ते करण्यात आलेm तसेच खासदार धैर्यशील पाटील यांच्या हस्ते श्री गणेशाचे पुजन करुन त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन करण्यात आले.

यावेळी खासदार धैर्यशील पाटील यांचे पुष्पवृष्टी करुन स्वागत करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी शिबीराला भेट देऊन डॉक्टरांशी, रुग्णांशी चर्चा केली. यावेळी खासदार धैर्यशील पाटील यांच्या समवेत नगरसेवक संतोष श्रृंगारपुरे, नगरसेविका तथा सभापती कलावती पाटील, नगरसेवक संजय म्हात्रे, नगरसेवक भूषण कडू, नगरसेवक कृष्णा भोईर, शिबीराचे आयोजक नगरसेविका पल्लवी कालेकर, अहाना पाटील या हजर होत्या या शिबीरामध्ये विविध आजारांवर तपासणी करून मोफत औषध देण्यात आले तसेच डॉक्टर केसकर यांच्या पॅथॉलॉजी मार्फत वेगवेगळ्या प्रकारच्या आजारांच्या तपासण्या करण्यात आल्या

शिबीर यशस्वी करण्यासाठी राकेश सिंग, सागर रिसबूड, राजन पाटील, सागर बहुलीकर, विना भाट, संतोष खांडेकर, सुनील धामणे, स्वाती धामणे, नितीन चव्हाण, आप्पा चाळके, सपना जाधव, विक्रम घाडगे, चिराग जैन, हितेश पोडवाल, आणि केतकी कालेकर, आदींसह कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यांत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मौजे वळक, तालुका पेण, जि. रायगड येथील विद्यमान मालक १. मनोहर शंकर वाघमारे, २. आनंदी शंकर वाघमारे, ३. रंजना दत्तु वाघमारे, ४. सोनी सजंय वाघमारे, ५.गणेश संजय वाघमारे, ६. सुरेश संजय वाघमारे, ७. सरिता संजय वाघमारे, ८. गणेश हरी नाईक, ९. नरेश हरी नाईक, १०. विमल गणेश हिलम, यांचे मालकी हक्काची, ताबेकब्जातील मिळकती असून सदरच्या मिळकती आमचे अशिलांनी कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर मिळकतीचे करारनामा करण्यांचे आहेत. परिशिष्टात वर्णनाते नमुद केलेल्या मिळकतीचे करारनामा करणार असल्याने या कारणासाठी जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे – वळक, तालुका – पेण, जिल्हा रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| २४ | ब / १७ | ३–२०–०० | ६.४० |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबध व अधिकार ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट समझोता करार, साठेकरार, विक्रीविनीमय गहाण, बोजा, दान, पोटगी वारसाहक्क, ट्रस्ट न्यास भाडेपट्टा सबलिज, अंडरलिज वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार खरेदीदारांचे वकील यांचे खालील पत्त्यावर प्रथम दर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल करण्यांत याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहारातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २३/३/२०२६

**सही/–**
**ॲड. कांचन एस. पाटील**
बी.ए.एलएल.बी.

पत्ताः– ऑफिस नं २०१, दुसरा मजला, साई आर्केड, जी पी पारसिक बँकेवरती, लाईफ लाईन हॉस्पीटलजवळ पनवेल बस स्टॅन्ड समोर पनवेल जि, रायगड ४१० २०६
फोन नं. ८६८९८०९८९६ ८१०८८८२६११

### पनवेल महानगरपालिका
तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड
### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता, पनवेल महानगरपालिका, पनवेल | ०५ गुलमोहर व ०१ रेन ट्री अशी एकूण **०६ झाडे** तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील **प्रभाग समिती – अ, प्रभाग क्र. २ मधील तोंडरे गाव** येथे पाण्याची टाकी ते बालाजी कंपाऊंडपर्यंत पावसाळी गटर व रस्त्याचे काँक्रीटीकरण कामामध्ये बाधित होत आहेत. |
| २ | M/s. 07 Associates, Office No. 7 & 8, Sai Prasad Chs., Plot No. 98/2. S.N. Road, Panvel-410206. | **०२ नारळ झाडे** तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील **फायनल प्लॉट नं–५०/ ६/ १२/ १३/१, पाटकर वाडा, बंदर रोड, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड** येथे भूखंडाच्या आवारातील ०२ झाडे हे नवीन इमारतीचे बांधकामात बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २३/०३/२०२६

**सही /–**
**उपायुक्त**
तथा वृक्ष अधिकार
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.८१/९१/२०२६

## खालापूर टोल नाक्यावर टेम्पोची धडक; चालक ठार

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई पुणे एक्सप्रेसवेवर आज सकाळी एका आयसर टेम्पोने समोरील अज्ञात वाहनाला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला असून या अपघातात टेम्पोचालकाचा जागीच मृत्यू झाला आहे

मुंबई पुणे एक्सप्रेसवेवरून आयसर टेम्पो चालक सुहेल बबन( वय ३३ रा माजूवा बलरामपूर, उत्तर प्रदेश) हा आयसर टेम्पो घेऊन मुंबईहुन पुण्याकडे जातं असताना तो खालापूर टोल नाक्याजवळ आला असता चालकाचे टेम्पो वरील नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील अज्ञात वाहनाला जोरदार धडक देऊन भीषण अपघात झाला,मात्र यात टेम्पोच्या केबिन मध्ये चालक अडकून त्याचा जागीच मृत्यू झाला आहे,

या अपघाताची माहिती मिळताच बोरघाट महामार्ग पोलीस, तात्काळ घटनास्थळी दाखल होत केबिन मध्ये अडकेलेल्या चालकाला बाहेर काढून प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात आले आहे,

### जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२६ ते २०३१ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नाव धनंवती सहकारी पतसंस्था मर्या. पनवेल. ता.पनवेल, जि. रायगड., असे असून सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. २५/०३/२०२६ ते ०२/०४/२०२६, नामनिर्देशन पत्र छाननी दि. ०६/०४/२०२६, नामनिर्देशन पत्र माघारी दि.०८/०४/२०२६ ते २२/०४/२०२६ व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक ०३/०५/२०२६ रोजी घेण्यांत येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणूकीबाबत सूचना व अधिक माहीती तालुका सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयामध्ये पहावयास मिळेल. तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

दिनांक : २३/०३/२०२६

**सही/–**
**(सुरेखा पाटील)**
निवडणूक निर्णय अधिकारी

Adv. Kedar Juvekar
Pawar Madam Court
Next Date : 27/04/2026

**(PUBLIC NOTICE)**

**IN THE COURT OF HON'BLE CIVIL JUDGE (S.D.) AT PANVEL CIVIL MISC. APPLICATION NO. 282 OF 2026**

**Smt. YOJANA SHIVAJI SALUNKE** )
Aged 55 years, Occupation Service )
Residing at Flat No. 302/ C-2, )
Haware Sahjivan Co-op. Housing Society
Plot No. 15, Sector-22, Kamothe,
Navi Mumbai, District Raigad, )
Pin 410 206, Maharashtra ) **..Applicant/**

**Versus**

**Smt. HEMLATA SHIVAJI SALUNKE** )
Age-Not Known, Occupation Not known)
r/o. 3/36, 5TH CROSS HMR LAYOUT, )
GOKULA POST, BBMP, )
Bengaluru Urban, Karnataka ) **..Respondent**

The above mentioned Applicant is the wife of late Shivaji Parshuram Salunke expired on 28/04/2024 at Bengaluru Urban in Karnataka State leaving behind him following property:

**PROPERTY DESCRIPTION**

1). A residential flat bearing Flat No. C-2/302 on 3rd floor situate at Hawre Green Park Sahjeevan Phase-1 Co-operative Housing Society Limited, Plot No. 15, Sector No. 22, Kamothe, Navi Mumbai, Taluka Panvel, District Raigad, Pin 410 209.

The Applicant has filed an application for grant of heirship certificate in respect of the above mentioned property. If any person/s has any right, title or interest of any nature in the above mentioned property of deceased above named is/are hereby invited to submit his/her/their objections in the above mentioned court within a period of 30 days from date of publication of this Notice.

AND if no objection is received within stipulated period of 30 days from the date of publication of this Public Notice, the Application of the Applicant shall be allowed and the heirship certificate as prayed for shall be granted. 17/03/2026

Sd/- Clerk | Court Seal | Sd/- Asstt Superintendent Civil Court (S.D.) Panvel.

Advocate Mrs. Swati Kadav

**NOTICE**

**BEFORE THE HON'BLE COURT OF CIVIL JUDGE (SENIOR DIVISION) PANVEL AT PANVEL MISC. APPLICATION NO. 291 /2026**

**MRS. SHARADHA SHIVRAM** Exh-6/D
Aged about 53 years,
Hindu by Religion,
Residing at : Flat no. B-19/02,
Kendriya Vihar, Sector 11, Navi Mumbai,
Kharghar, Raigarh,
Maharashtra - 410210
Mobile no: 9869032752 .......... **APPLICANT**

**V/s**

**1. MR. SIDDHARTH SHIVRAM**
Aged about 25 years,
Hindu by Religion,
Residing at : Flat no. B-19/02, Kendriya vihar,
Sector 11, Navi Mumbai, Khargar,
Raigarh, Maharashtra - 410210
Mobile no: +1(905)7831498

**2. MRS. SUNDARI RAMAN IYER**
Aged about 81 years,
Hindu by Religion,
Residing at : Flat no. B-10/07, Kendriya Vihar,
Sector 11, Navi Mumbai, Kharghar,
Raigarh, Maharashtra - 410210
Mobile no: 9702559806 ...... **NON-APPLICANTS**

Whereas the Applicant hereinabove has applied for obtaining Heirship certificate with respect to the properties mentioned in the schedule hereunder written which was owned and possessed by Late Shri Shivram Ganapathyraman Iyer.

Shri Shivram Ganapathyraman Iyer expired on 15-05-2025 due to illness at Chennai. Late Shri. Ganapathyraman Sivaraman Naranamalpuram (i.e., the father of the above said deceased Shivram Ganapathyraman Iyer) has expired on 15-06-2019 at Kharghar.
Late Shri Shivram Ganapathyraman Iyer is survived by his wife Mrs. Sharadha Shivram, son Mr. Siddharth Shivram and Mother Mrs. Sundari Raman Iyer and other than the present Applicant and Non-Applicants there are no other legal heirs.

TAKE NOTE THAT if anyone has any objection to issuing Heirship certificate to the applicant, the same shall be submitted in writing to this Court within 30 days from the date of Publication of this notice. If no objections are received, this Court will issue heirship certificate to the Applicant on compliance with all legal formalities.

<u>SCHEDULE OF THE PROPERTY NO. 1 (FLAT)</u>
Flat no. 07, Block A-15, Third Floor, Flat Area Admeasuring 425 Square Feet (Built-Up), in the building known as "Kendriya Vihar" and Society known as "Kendriya Vihar-2 Co-Operative Housing Society Limited", under CGEWHO-Khargar Housing Scheme, constructed on piece of land situate at Sector-11, Kharghar, Taluka-Panvel, Navi Mumbai.

<u>SCHEDULE OF THE PROPERTY NO. 2 (FLAT)</u>
Flat no. B-19/02, Flat Area Admeasuring 81.59 Square Meters (Carpet Area), in the building known as "Kendriya Vihar" and Society known as "Kendriya Vihar (3) Co-Operative Housing Society Limited", under CGEWHO-Khargar Housing Scheme, constructed on piece of land situate at Sector-11, Kharghar, Taluka-Panvel, Navi Mumbai.

The market value of the said property is <u>Rs. 52,45,333/- (Rupees Fifty-two lakhs forty-five thousand three hundred and thirty-three Only).</u>
Given under my hand & seal on this 23rd day of March, 2026.

Sd/- Clerk | Court Seal | By Order Asst Superintendent Civil Judge (S D) Panvel

### महाराष्ट्र शासन
### महसुल व वनविभाग
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय,**
तळा जि. रायगड दुरध्वनी क्रमांक – ०२१४०–२६९३१७
Email ID– tahasiltala@gmail.com

क्र. प्रशासन कात–५/जन्म–मृत्यू/जाहिर नोटीस/२०२६

### जाहीर नोटीस मसुदा

१. श्री. बाळाराम मनोहर जाधव मु. पढवण ता. तळा जि.रायगड
२. मुख्याद्यापक रा.जि.शाळा पढवण ता. तळा जि.रायगड } **अर्जदार**

**विरुध्द**

१. निबंधक जन्म–मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती तळा
२. निबंधक जन्म–मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत पढवण, तालुका तळा, जिल्हा रायगड } **सामनेवाला**

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. बाळाराम मनोहर जाधव व इतर रा. पढवण ता. तळा त्यांची मुलगी कु. देवयानी बाळाराम जाधव जन्म दिनांक १२/०३/२०१५ रोजी मौजे पढवण, ता.तळा, जि.रायगड येथे झाले असून त्यांचे नोंद सामनेवाल्यांचे कार्यलयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दिला आहे.

त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांची मुलगी कु. देवयानी बाळाराम जाधव जन्म दिनांक १२/०३/२०१५ रोजी मौजे पढवण, ता. तळा, येथे झाले असल्याचे घोषीत करुन दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे अथवा हरकत असल्यास त्याकरीता **१५ दिवसाच्या** मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे.न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

सबब विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास श्री. बाळाराम मनोहर जाधव रा. पढवण, ता.तळा त्यांची मुलगी कु. देवयानी बाळाराम जाधव जन्म दिनांक १२/०३/२०१५ रोजी मौजे पढवण, ता. तळा यांचे नोंदबाबत सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि. १२/०३/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

दिनांक : २३/०३/२०२६ | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **(स्वाती पाटील)** कार्यकारी दंडाधिकारी तळा

### महाराष्ट्र शासन
### महसुल व वनविभाग
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय,**
तळा जि. रायगड दुरध्वनी क्रमांक – ०२१४०–२६९३१७
Email ID– tahasiltala@gmail.com

क्र. प्रशासन कात–५/जन्म–मृत्यू/जाहिर नोटीस/२०२६

### जाहीर नोटीस मसुदा

१. श्री. बाळाराम मनोहर जाधव मु. पढवण ता. तळा जि.रायगड
२. मुख्याद्यापक रा.जि.शाळा पढवण ता. तळा जि.रायगड } **अर्जदार**

**विरुध्द**

१. निबंधक जन्म–मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती तळा
२. निबंधक जन्म–मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत पढवण, तालुका तळा, जिल्हा रायगड } **सामनेवाला**

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. बाळाराम मनोहर जाधव व इतर रा. पढवण ता. तळा त्यांची मुलगी कु. दिव्या बाळाराम जाधव जन्म दिनांक ०४/०३/२०१७ रोजी मौजे पढवण, ता.तळा, जि.रायगड येथे झाले असून त्यांचे नोंद सामनेवाल्यांचे कार्यलयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दिला आहे.

त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांची मुलगी कु. दिव्या बाळाराम जाधव जन्म दिनांक ०४/०३/२०१७ रोजी मौजे पढवण, ता. तळा, येथे झाले असल्याचे घोषीत करुन दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे अथवा हरकत असल्यास त्याकरीता **१५ दिवसाच्या** मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे.न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

सबब विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास श्री. बाळाराम मनोहर जाधव व इतर रा. पढवण, ता.तळा त्यांची मुलगी कु. दिव्या बाळाराम जाधव जन्म दिनांक ०४/०३/२०१७ रोजी मौजे पढवण, ता. तळा यांचे नोंदबाबत सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि. १२/०३/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

दिनांक : २३/०३/२०२६ | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **(स्वाती पाटील)** कार्यकारी दंडाधिकारी तळा

### महाराष्ट्र शासन
### महसुल व वनविभाग
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय,**
तळा जि. रायगड दुरध्वनी क्रमांक – ०२१४०–२६९३१७
Email ID– tahasiltala@gmail.com

क्र. प्रशासन कात–५/जन्म–मृत्यू/जाहिर नोटीस/२०२६

### जाहीर नोटीस मसुदा

श्री. दिलीप हरिश्चंद्र जाधव रा. मेढे ता. तळा जि.रायगड } **अर्जदार**

**विरुध्द**

१. निबंधक जन्म–मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती तळा
२. निबंधक जन्म–मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत मेढा, तालुका तळा, जिल्हा रायगड } **सामनेवाला**

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. दिलीप हरिश्चंद्र जाधव रा. मेढा आदि. वाडी ता. तळा त्यांची मुलगी कु. विशाली दिलीप जाधव जन्म दिनांक २३/०६/२०१४ रोजी मौजे मेढा आदिवासी वाडी, ता.तळा, जि.रायगड येथे झाले असून त्यांचे नोंद सामनेवाल्यांचे कार्यलयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दिला आहे.

त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांची मुलगी कु. विशाली दिलीप जाधव जन्म दिनांक २३/०६/२०१४ रोजी मौजे मेढा आदिवासी वाडी, ता. तळा, येथे झाले असल्याचे घोषीत करुन दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे अथवा हरकत असल्यास त्याकरीता **१५ दिवसाच्या** मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे.न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

सबब विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदार श्री. दिलीप हरिश्चंद्र जाधव रा. मेढा आदि.वाडी ता.तळा त्यांची मुलगी कु. विशाली दिलीप जाधव जन्म दिनांक २३/०६/२०१४ रोजी मौजे मेढा आदिवासी वाडी, ता.तळा यांचे नोंदबाबत सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि. १२/०३/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

दिनांक : २३/०३/२०२६ | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **(स्वाती पाटील)** कार्यकारी दंडाधिकारी तळा

### महाराष्ट्र शासन
### महसुल व वनविभाग
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय,**
तळा जि. रायगड दुरध्वनी क्रमांक – ०२१४०–२६९३१७
Email ID– tahasiltala@gmail.com

क्र. प्रशासन कात–५/जन्म–मृत्यू/जाहिर नोटीस/२०२६

### जाहीर नोटीस मसुदा

श्रीम. येणु नारायण वाघमारे रा. मेढे ता. तळा जि.रायगड } **अर्जदार**

**विरुध्द**

१. निबंधक जन्म–मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती तळा
२. निबंधक जन्म–मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत मेढा, तालुका तळा, जिल्हा रायगड } **सामनेवाला**

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. येणु नारायण वाघमारे रा. मेढा आदि. वाडी ता. तळा त्यांची मुलगी कु. शाबी बबन पवार जन्म दिनांक २९/०३/२०१३ रोजी मौजे मेढा आदिवासी वाडी, ता.तळा, जि.रायगड येथे झाले असून त्यांचे नोंद सामनेवाल्यांचे कार्यलयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दिला आहे.

त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांची मुलगी कु. शाबी बबन पवार जन्म दिनांक २९/०३/२०१३ रोजी मौजे मेढा आदिवासी वाडी, ता. तळा, येथे झाले असल्याचे घोषीत करुन दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे अथवा हरकत असल्यास त्याकरीता **१५ दिवसाच्या** मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे.न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

सबब विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदार श्रीम. येणु नारायण वाघमारे रा. मेढा आदि.वाडी ता.तळा त्यांची मुलगी कु. शाबी बबन पवार जन्म दिनांक २९/०३/२०१३ रोजी मौजे मेढा आदिवासी वाडी, ता.तळा यांचे नोंदबाबत सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि. १२/०३/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

दिनांक : २३/०३/२०२६ | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **(स्वाती पाटील)** कार्यकारी दंडाधिकारी तळा

# नवी मुंबई महापालिकेची मालमत्ता कर थकबाकीदाराविरोधात धडक कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या कर विभागाने थकबाकीदारांविरोधात तत्काळ कठोर कारवाई करावी व संबंधितांना नोटीस बजावून ३१ मार्च २०२६ पर्यंत कर न भरल्यास त्यांच्या मालमत्ता नियमानुसार जप्त करून त्यांची लिलाव प्रक्रिया सुरू करावी, असे स्पष्ट निर्देश नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी मालमत्ता कर वसुलीचा आढावा घेताना दिले. बिगरनिवासी, औद्योगिक तसेच मोकळ्या जागांच्या मालमत्ता थकबाकीदारांवर प्रामुख्याने जप्तीची व लिलावाची कारवाई करण्यात यावी असे देखील आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. आयुक्त महोदय यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभागांतील अधिकाऱ्यांची मालमत्ता कर वसूली संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत असलेल्या मालमत्ता कराच्या वसूलीस गती देण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. मात्र, अद्यापही काही मालमत्ताधारकांनी कर भरलेला नसल्याचे निर्दर्शनास आले असून, अशा थकबाकीदारांविरोधात जप्तीची कारवाई करून त्या मालमत्तेची लिलाव प्रक्रिया करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले आहेत. त्यानुसार विहित मुदतीची नोटीस दिल्यानंतरही ३१ मार्च २०२६ पर्यंत कर न भरल्यास संबंधित मालमत्तांवर



जप्तीची कारवाई करून त्याची लिलाव प्रक्रिया सुरू करण्यात येईल.

महत्वाचे म्हणजे नवी मुंबई महानगरपालिकेकडून मालमत्ता कर थकबाकीदारांसाठी १० मार्च २०२६ रोजी अभय योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत निवासी, बिगरनिवासी, औद्योगिक तसेच मोकळ्या जागांच्या मालमत्ता कराची थकबाकी एकरकमी भरल्यास संबंधित मालमत्ताधारकांना विलंब शुल्कावर ५० टक्के सवलत देण्यात येत आहे. सदर सवलतीचा लाभ घेण्यासाठी आर्थिक वर्ष २०२५-२०२६ पर्यंतची संपूर्ण थकबाकी निर्दिष्ट कालावधीत एकरकमी भरणे आवश्यक असून, या योजनेची मुदत ३१ मार्च २०२६ रोजी, रात्री १२ वाजेपर्यंत आहे. याशिवाय महानगरपालिकेकडून मालमत्ता कर भरण्यासाठी ऑनलाईन तसेच ऑफलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### ऑनलाईन कर भरण्यास मिळतेय पसंती

नवी मुंबई शहरातील मालमत्ताधारकांसाठी आठही विभाग कार्यालयांमध्ये कर संकलन केंद्रांत प्रत्यक्ष कर भरण्याची सुविधा उपलब्ध असून, त्याचबरोबर नागरिकांच्या सोयीसाठी ऑनलाईन पद्धतीनेही मालमत्ता कर भरण्याची व्यवस्था उपलब्ध आहे. त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ पर्यंतचा मालमत्ता कर भरण्यासाठी केवळ ८ दिवसांची म्हणजेच ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदत राहिली आहे. तरी अद्याप ज्या मालमत्ताधारकांनी कर भरलेला नाही, त्यांनी महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन किंवा WhatsApp Chatbot ८२९१९२०५०४ द्वारे किंवा कर संकलन केंद्रात प्रत्यक्ष जाऊन आपला मालमत्ता कर भरावा, असे आवाहन महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

## गैरसमजातून एका व्यक्तीला मारहाण

**नवी मुंबई : बातमीदार**

घणसोलीतील उद्यानात व्यायाम करणाऱ्या महिलेची छेड काढून एक तरुण पळून गेला, मात्र संशयातून त्याच्याजवळ बसलेल्या निष्पाप व्यक्तीला महिलेसह तिच्या नातेवाईकांनी मारहाण केल्याची घटना बुधवारी रात्री घडली. याप्रकरणी रबाळे पोलिसांनी महिलेसह तिच्या नातेवाईकांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

तलावलगतच्या उद्यानाबाहेर एक व्यक्ती बसलेली असताना एक अनोळखी तरुण त्याच्याकडे तंबाखू मागून त्याच्या शेजारी बसला. यावेळी उद्यानात व्यायाम करणाऱ्या महिलेची त्या तरुणाने छेड काढली. महिला त्याच्याकडे वळताच तो घटनास्थळावरून पळून गेला, मात्र संशयाच्या भरात महिलेला तोच व्यक्ती दोषी असल्याचा गैरसमज झाला आणि तिने व तिच्या नातेवाईकांनी त्या व्यक्तीला पकडून मारहाण केली. जखमी व्यक्तीच्या मदतीला आलेल्या त्याच्या कुटुंबीयांनाही मारहाण करण्यात आली. घटनेत जखमी व्यक्तीच्या तक्रारीवरून रबाळे पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला.

# नवी मुंबईतील सर्व विभागांमध्ये जागतिक जल दिन उत्साहात

## अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतली जलरक्षक शपथ



**नवी मुंबई : बातमीदार**

युनायटेड नेशन (वॉटर) या संस्थेच्या वतीने दरवर्षी २२ मार्च या दिवशी जागतिक जलदिन साजरा करण्यात येतो. स्वच्छ आणि ताज्या पाण्याच्या नैसर्गिक स्त्रोतांची काळजी घेणे आणि त्यांच्या शाश्वत संरक्षणासाठी कार्यरत राहणे हा संदेश प्रसारित करण्यासाठी जागतिक जल दिनानिमित्त संपूर्ण विश्वभरात १९९३ पासून विविध उपक्रम आयोजित केले जातात.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीनेही महापालिका आयुक्त डॉ कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त शहर अभियंता श्री अरविंद शिंदे यांच्या माध्यमातून आठही विभाग कार्यालय क्षेत्रात मुख्य जलकुंभांच्या ठिकाणी कार्यकारी अभियंता तसेच पाणीपुरवठा विभागातील संबंधित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जलदिन साजरा केला. जागतिक जलदिनाचे औचित्य साधून सर्व ठिकाणी सामुहिक जलशपथ घेण्यात आली.

पाणी ही जीवनावश्यक गोष्ट असून पिण्यायोग्य पाण्याचे पृथ्वीवरील अत्यल्प प्रमाण लक्षात घेऊन उपलब्ध जलस्त्रोतांचे संवर्धन करणे व पाण्याचा काटकसरीने वापर करणे अत्यंत महत्वाचे असल्याचे लक्षात घेत संयुक्त राष्ट्र संघाने १९९३ पासून २२ मार्च हा दिवस 'जागतिक जल दिन' म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली.

यावर्षी संयुक्त राष्ट्र संघाने 'पाणी आणि लिंगभाव : जिथे पाणी वाहते तिथे समानता वाढते.' हे जागतिक जलदिनाचे घोषवाक्य जाहीर केले आहे. आपण या वसुंधरेला वाचवू शकतो आणि आपले भविष्य सुरक्षित करू शकतो. यासाठी देशाचा जलरक्षक म्हणून कायम कार्यरत राहण्याची मी शपथ घेत आहे अशा आशयाच्या जलशपथेमध्ये पाणी बचत व पाण्याचा विवेकी वापर करण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली. तसेच पाण्याचा थेंब अन् थेंब साठवून 'कॅच द रेन' या अभियानाच्या यशस्वितेसाठी मी संपूर्ण सहयोग देईन व पाण्याला एक अनमोल संपदा मानून पाण्याचा वापर करेन अशीही शपथ घेण्यात आली. पाण्याचा विवेकी वापर करण्याबाबत व पाण्याचा अपव्यय टाळण्याबाबत मी, माझे कुटुंबिय व मित्र आणि शेजाऱ्यांना प्रेरीत करेन असेही प्रतिज्ञेत नमूद आहे.

नवी मुंबई हे स्वतःच्या मालकीच्या मोरबे धरणामुळे जलसमृध्द शहर असले तरी प्रत्येक व्यक्तीने स्वतःला किती पाण्याची गरज आहे हे ओळखून पाण्याचा आवश्यक तेवढाच वापर करण्याचे आवाहन जागतिक जलदिनाचे औचित्य साधून महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले.

# अण्णासाहेब पाटील यांना अभिवादन

**नवी मुंबई : बातमीदार**

मराठा आरक्षण चळवळीचे जनक आणि माथाडी कामगारांचे ज्येष्ठ नेते स्व. आमदार अण्णासाहेब पाटील यांची ४४ वी पुण्यतिथी वाशी येथील माथाडी भवनमध्ये अभिवादन सभेने साजरी करण्यात आली.

यावेळी माथाडी कामगार, विविध संघटनांचे नेते तसेच राजकीय प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अण्णासाहेब पाटील यांना त्रिवार वंदन केले. माथाडी भवन येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमात त्यांच्या माथाडी कामगारांच्या हक्कांसाठी केलेल्या संघर्षमय कार्याचा तसेच मराठा समाजासाठी दिलेल्या मोलाच्या योगदानाचा गौरवपूर्वक उल्लेख करण्यात आला. या प्रसंगी माथाडी कामगार संघटनांचे नेते नरेंद्र पाटील, शशिकांत शिंदे, गुलाबराव जगताप, चंद्रकांत पाटील, रवी पाटील, पोपटराव देशमुख यांच्यासह अनेक कामगार उपस्थित होते.

### माथाडी भवनात ४४ वी पुण्यतिथी



अण्णासाहेब पाटील यांचे कार्य सदैव प्रेरणादायी असल्याचे सांगत उपस्थितांनी त्यांना 'कामगारांचे तारणहार' म्हणून गौरविले. आपल्या आयुष्याचे बलिदान देऊन त्यांनी माथाडी कामगारांना हक्काचे आणि सन्मानाचे जीवन मिळवून दिले, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# महाराष्ट्र ओबीसी कृती समितीची कार्यकारणी बैठक व पदभार सोहळा

## खारघर येथे राज्यव्यापी मेळावा

**उरण : बातमीदार**

लेवे गुजर समाज व कराडी समाजच्या वतीने महाराष्ट्र ओबीसी कृती समितीची कार्यकारिणीची राज्यव्यापी बैठक व पदभार सोहळा रविवार, २२ मार्च २०२६ रोजी लेवे गुजर भवन, सेक्टर २७, प्लॉट नंबर ५७ रांजणपाडा, श्रीराम मंदिरच्या पाठीमागे, पेठपाडा मेट्रो रेल्वे स्टेशनजवळ खारघर, पनवेल, नवी मुंबई येथे सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत मोठया उत्साहात संपन्न झाला.

यावेळी संरक्षक मंडळचे पदाधिकारी डॉ. नामदेवराव राऊत, प्रकाश सिद्ध, पी आर बडगुजर, एस एम बडगुजर, शालिकजी नेवारे, मधुकरजी चोपडे, हेमंत ढोले, अध्यक्ष श्रावण फरकाडे, कार्याध्यक्ष राम खरपूरिया, महिला कार्याध्यक्ष सरिता गाकरे,संपर्क प्रमुख नरेंद्र बडगुजर, महासचिव मोरेश्वर भादे, सचिव दिपक नेवे, कोषाध्यक्ष मुकुंद मुसळे,कराडी समाजाचे महाराष्ट्र अध्यक्ष



महादेव बंडा,प्रल्हाद कासकर, शांताराम गुजर, सह कोषाध्यक्ष विकास संसारे, रविंद्र गोलांडे, उपाध्यक्ष विलास पाटील, श्याम सरगिरे, मुकुंद अडेवार, संदीप गोलाईल, अनिल बोरसे,आर डी चौधरी, सुनील महाजन,सतिश गुर्जर कायदेविषयक सल्लागार ॲड.चंद्रकांत बिडकर, नरेंद्र कापगाते आदी पदाधिकारी सदस्य, मान्यवर उपस्थित होते.

बहुमताने सर्व ठराव पास करण्यात आले.त्यानंतर कराडी समाजाचे महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष मधुकर सुरते यांनी कृती समितीच्या सर्व पदाधिकारी सदस्यांचे व उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले.राष्ट्रगीता नंतर कार्यक्रमाचा समारोप झाला.सदर कार्यक्रमाचे सुंदर व उत्तम असे सूत्रसंचालन रोहिदास चौधरी यांनी केले.सदर राज्यव्यापी ओबीसी समाजाच्या मेळाव्याचे उत्तम, सुंदर असे नियोजन केल्याने सर्व मान्यवरांनी आयोजकांचे कौतुक केले.

## भरारी पथकाकडून प्लास्टिक साठा जप्त

■ १५ हजारांचा दंड वसूल

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या घणसोली आणि ऐरोली विभागांत डेब्रिजविरोधी भरारी पथकाच्या परिमंडळ २च्या वतीने तीन फेरीवाल्यांवर कारवाई करून प्लास्टिकच्या पिशव्यांसह एकूण १५ हजार रुपयांची दंडात्मक वसुली करण्यात आली.

नवी मुंबई महापालिकेच्या ऐरोली 'जी' विभाग कार्यक्षेत्रातील दुकानदार आणि फेरीवाले यांच्यावर प्रतिबंध प्लास्टिकचा वापर केल्याप्रकरणी प्रत्येकी ५ हजार रुपयांप्रमाणे तिघा जणांकडून एकूण १५ हजार रुपयांची दंडात्मक वसुली करण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या आदेशानुसार, परिमंडळ २ चे उपायुक्त संजय शिंदे यांच्या नेतृत्वाखाली डेब्रिजविरोधी विशेष भरारी पथकाचे लिपिक डी. आर. पाटील यांच्यासह सुरक्षारक्षकांनी कारवाई केली.

# सीकेटी विद्यालयात स्वच्छता अभियानाचा जागर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छतेचा संदेश जनमानसात रुजवण्यासाठी सामाजिक वनीकरण विभाग, अलिबाग (रायगड) यांच्या वतीने चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयात सोमवार, २३ मार्च २०२६ रोजी विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. 'स्वच्छ भारत, सुंदर भारत' या संकल्पनेला अनुसरून आयोजित केलेल्या या उपक्रमात विद्यार्थी आणि शिक्षकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

या मोहिमेची सुरुवात सामाजिक वनीकरण विभाग अलिबाग, रायगड (परिक्षेत्र पनवेल) येथील प्रज्ञा वडमारे (वनक्षेत्रपाल पनवेल), समीर जाधव (परिमंडळ



वन अधिकारी, पनवेल) श्री राकेश शिंदे (परिमंडळ वन अधिकारी, उरण) तसेच शाळेचे मुख्याध्यापक कैलास सत्रे व पर्यवेक्षक कैलास म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. यावेळी उपस्थित वन अधिकारी समीर जाधव यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देतानाच, केवळ परिसर स्वच्छ ठेवणे पुरेसे नसून प्लास्टिकचा वापर टाळणे आणि जास्तीत जास्त वृक्षारोपण करणे काळाची गरज असल्याचे सांगितले.

हातात झाडू, टोपल्या आणि कचरा पिशव्या घेऊन विद्यार्थ्यांनी शाळेचे क्रीडांगण, वर्गखोल्या ,परसबाग आणि शाळेचा बाह्य परिसर चकाचक केला. जमा झालेल्या कचऱ्याचे ओला आणि सुका अशा दोन गटात वर्गीकरण करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली.

कार्यक्रमाच्या शेवटी सामाजिक वनीकरण विभागातर्फे विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणाबाबत प्रमाणपत्र वाटण्यात आली. शालेय वयापासूनच विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची सवय लागली, तरच भविष्यात प्रदूषणमुक्त समाज निर्माण होईल, असे मत शाळेचे मुख्याध्यापक कैलास सत्रे यांनी यावेळी व्यक्त केले.

# रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागाचा सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागीय संस्कृतिक कार्यक्रम सोमवारी संस्थेच्या नवी मुंबई वाशी येथील मॉडर्न स्कुल येथे पार पडला.

प्रतिवर्षी ९ मे ला सातारा येथे रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त ७ व ८ मे रोजी संस्थेच्या पाचही विभागातून विविध संस्कृतिक कार्यक्रम सादर करून त्यांना आदरांजली वाहिली. त्यानिमित्त सोमवारी सांस्कृतिक कार्यक्रम निवडीची स्पर्धा झाली. या स्पर्धेत रायगड विभागातील् फुंडे, रिटघर, पडवळपाडा, पोलादपूर, पिरकोन, वावंजे, पळसपे, जासई, करंजा, नावडे, कामोठे, दापोली, उलवा, गव्हाण व वाशी येथील विद्यालयातील विदयार्थ्यांनी सहभाग घेतला.

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील मॉडर्न स्कुलच्या सभागृहात पार पडलेल्या



या कार्यक्रमास विनायक सकपाळ (कला अकॅडमी परीक्षक, कर्मवीर विद्या प्रबोधिनी रयत शिक्षण संस्था सातारा), अमोल बोधे (कला अकॅडमी परीक्षक, कर्मवीर विद्या प्रबोधिनी,रयत शिक्षण संस्था सातारा) मोहन कोंगेरे (विभागीय अधिकारी रायगड), सुमित्रा भोसले (प्राचार्या मॉडर्न स्कुल वाशी), संतोष गुजर (वरिष्ठ लेखनिक), वैभव गावंड यांच्यासह शिक्षक व विदयार्थी उपस्थित होते.

# डॉ. बबनराव नागरगोजेंना राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार साठी निवड झालेल्या व्यक्ती व संस्थांची नावे जाहीर करण्यात आली असून, रायगड जिल्ह्यातील खोपोली येथील डॉ. बबनराव नागरगोजे यांची या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवड झाली आहे. व्यसनमुक्ती क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन लेखक गटातून त्यांना हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. डॉ. नागरगोजे यांनी वैद्यकीय क्षेत्रासोबतच सामाजिक बांधिलकी जपत व्यसनमुक्ती जनजागृतीसाठी सातत्याने कार्य केले असून त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

दि. २६ मार्च रोजी सकाळी ११ वाजता मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार असून या सोहळ्यास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच या कार्यक्रमाच्या अनुषंगाने दि. २५ मार्च रोजी सकाळी ९ वाजता व्यसनमुक्ती जनजागृती दिंडीची सुरुवात गेटवे ऑफ इंडिया येथून होऊन सांगता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे होणार आहे. त्यानंतर दुपारी व्यसनमुक्ती विषयक चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. बबनराव नागरगोजे हे भाजप वैद्यकीय सेल कोकण विभागाचे संयोजक असून रायगड जिल्हा मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष म्हणूनही उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांना यापूर्वी रायगड भूषण, आरोग्यम धनसंपदा तसेच इतर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. वैद्यकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह वैद्यकीय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी डॉ. बबनराव नागरगोजे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्या या यशामुळे रायगड जिल्ह्याचा मान उंचावला असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

## १३१ ठिकाणी 'जलजीवन' सुरू

**पनवेल :** तालुक्यात १३१ ठिकाणी जलजीवन मिशन योजनेअंतर्गत कामे सुरु आहेत. यातील ३७ कामे पूर्ण झाल्याची माहिती पाणीपुरवठा विभाग पनवेल, पंचायत समिती यांच्याकडून देण्यात आलेली आहे.

गेल्या तीन ते चार वर्षांपासून सुरू असलेल्या जलजीवन मिशन योजनेचे काम सुरू होते. निधी, जागेची कमतरता आणि अन्य कारणांमुळे अनेक कामे रखडली. तालुक्यातील ३७ ठिकाणची कामे पूर्ण झालेली असून आणखी ३७ ठिकाणची कामे पूर्णत्वास आलेली आहेत. थोड्याफार प्रमाणात ही कामे अर्धवट आहेत.

# उरण महाविद्यालयात ग्राहक हक्क दिन

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठचे उरण वाणिज्य कला महाविद्यालय वाणिज्य विभाग व अजीवन अध्ययन निरंतर व विस्तार विभागातर्फे उरण महाविद्यालयामध्ये जागतिक ग्राहक हक्क दिन प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांच्या मार्गदर्शनानुसार साजरा करण्यात आला.

जागतिक ग्राहक हक्क दिनाचे उद्दिष्टे व महत्त्व प्रा. व्ही. एस. इंदुलकर यानी कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रस्तावनेत स्पष्ट केले. ग्राहक हा राजा आहे व त्याचे कायद्याने दिलेले मूलभूत हक्क याबाबत विश्लेषण करण्यात



आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने रवींद्र चव्हाण, साकलेन डाखवे, खुशी शर्मा व देवयानी खैरनार या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या विद्यार्थ्यांनी खूप चांगल्या प्रकारे ग्राहक हक्क व दिनाचे महत्त्व आपल्या उत्कृष्ट वकृत्व शैलीत व्यक्त केले.

विद्यार्थ्यांचे मनोगत खूपच प्रभावी होते. मुंबई विद्यापीठाचे अभ्यास मंडळाचे सदस्य व पीएचडी गाईड डॉ. पराग कारुळकर सर हे देखील कार्यक्रमास हजर होते. ग्राहकाचे हक्क व संरक्षण याबद्दलचे महत्त्व उदाहरणासहित देऊन स्पष्ट केले व प्रत्यक्षात आपले अनुभव त्यांनी सर्वांना सांगितले. शेवटी कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. व्ही एस इंदुलकर सरांनी सर्वांचे आभार मानले.

### महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# उद्यापासून रायगड जिल्हा कबड्डी संघ सराव शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिन्नर (जि. नाशिक) येथे दिनांक २ एप्रिल ते ६ एप्रिल २०२६ या कालावधीत होणाऱ्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या पुरुष व महिला कबड्डी संघांचे सराव शिबिर आयोजित करण्यात आले आहे. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने हे शिबीर दि. २५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत पनवेल येथे उत्साहात पार पडणार आहे. दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त या विशेष कबड्डी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर शिबिराचे आयोजन भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे माजी सरकार्यवाह ॲड. आस्वाद पाटील तसेच रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या कार्यवाह चित्रा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण मिळावे आणि राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सक्षम तयारी व्हावी, हा या शिबिरामागील मुख्य उद्देश आहे. या शिबिरामध्ये पुरुष संघातील १४ खेळाडू व दोन प्रशिक्षक तसेच महिला संघातील १४ खेळाडू व दोन प्रशिक्षक अशा एकूण ३२ जणांचा सहभाग असणार आहे. सर्व खेळाडूंसाठी निवास, भोजन व इतर आवश्यक सुविधांची उत्तम व नियोजनबद्ध व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक खेळाडूस संपूर्ण स्पोर्ट्स किट्स श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे प्रदान करण्यात येणार आहेत.

खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित या शिबिराचे उद्घाटन बुधवार, २५ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे. या उद्घाटन समारंभाला क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी व कबड्डीप्रेमी उपस्थित राहणार आहेत. शिबिराची संपूर्ण तयारी शिबीर प्रमुख आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक शरद कदम तसेच छत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. त्यांच्या अनुभवी मार्गदर्शनामुळे खेळाडूंना तांत्रिक, शारीरिक व मानसिक पातळीवर सक्षम बनविण्यात येणार आहे.

या शिबिरातून तयार होणारा रायगड जिल्हा कबड्डी संघ आगामी राज्य स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला असून, या उपक्रमामुळे जिल्ह्यातील कबड्डी खेळाला निश्चितच चालना मिळणार आहे.

## संजू सॅमसनला सध्या तरी कर्णधार करू नका -उथप्पा



**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६च्या हंगामापूर्वी चेन्नई सुपर किंग्सच्या (सीएसके) गोटात नेतृत्वावरून सुरू असलेल्या चर्चेत आता एका दिग्गज खेळाडूने उडी घेतली आहे. आयपीएलमध्ये जवळपास पाच हजार धावांचा टप्पा पार करणारे टीम इंडिया आणि सीएसकेचे माजी फलंदाज रॉबिन उथप्पा यांनी ऋतुराज गायकवाडचे समर्थन केले असून संजू सॅमसनला कर्णधार करण्याच्या प्रस्तावाला विरोध दर्शवला आहे.

एका क्रीडा कार्यक्रमात बोलताना उथप्पा म्हणाला की, ऋतुराज गायकवाडला कर्णधार म्हणून स्थिर होण्यासाठी पुरेसा वेळ दिला पाहिजे. मला वाटत नाही की, सीएसकेने आताच संजू सॅमसनकडे नेतृत्वाची धुरा सोपवावी. ऋतुराज २०२४पासून संघाचे नेतृत्व करत आहे. तो हळूहळू महेंद्रसिंह धोनीच्या सावलीतून बाहेर पडत असून त्याला स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी आणि क्षमता सिद्ध करण्यासाठी व्यवस्थापनाने पाठबळ दिले पाहिजे, असे स्पष्ट मत उथप्पाने व्यक्त केले.

आयपीएल २०२६पूर्वी झालेल्या एका मोठ्या 'ट्रेड'मुळे संजू सॅमसन या हंगामात पहिल्यांदाच चेन्नईच्या पिवळ्या जर्सीत खेळताना दिसणार आहे. संजूच्या आगमनामुळे तोच संघाचा नवा कर्णधार होणार, अशा चर्चांना उधाण आले होते, मात्र चेन्नई सुपर किंग्सने ऋतुराज गायकवाडच कर्णधारपदी कायम राहील, असे स्पष्ट करून या चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

**धोनीच्या निवृत्तीवरही केले भाष्य**

महेंद्रसिंह धोनीबाबत उथप्पा म्हणाला की, मला वाटते की धोनीचा खेळाडू म्हणून हा शेवटचा आयपीएल हंगाम असेल. यावर्षी तो 'मेंटर' (मार्गदर्शक) आणि खेळाडू अशा दुहेरी भूमिकेत दिसेल. जेव्हा धोनी मैदानावर नसेल, तेव्हाच ऋतुराजच्या नेतृत्वाची खरी कसोटी लागेल.

## मेरा युवा भारत अंतर्गत जिल्हा क्रीडा स्पर्धा



**रायगड : रामप्रहर वृत्त**

मेरा युवा भारत, युवा कार्यक्रम एवं खेळ मंत्रालय भारत सरकार व प्रिझम सामाजिक विकास संस्था, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने पी.एन.पी. कॉलेज वेश्वी, अलिबाग येथे (दि.२१ मार्च रोजी) जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा झाल्या.

यावेळी अमित पुंडे (जिल्हा युवा अधिकारी मेरा युवा भारत), तपस्वी नंदकुमार गोंधळी (राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी भारत सरकार तथा अध्यक्षा प्रिझम सामाजिक विकास संस्था), सुचिता साळवी (संचालिका स्पर्धा विश्व अकॅडमी), क्रीडा शिक्षक तेजस म्हात्रे, यतीराज पाटील, पंच पुरुषोत्तम पिंगळे, नंदकुमार वरसोलकर आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी उपस्थित बहुसंख्य खेळाडूंना शुभेच्छा व मार्गदर्शन करताना खेळाचे आपल्या आयुष्यातील महत्त्व पटवून दिले. मेरा युवा भारत अंतर्गत तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत विजयी झालेल्या संघांना क्रीडा साहित्याचे वाटपदेखील करण्यात आले. प्रास्ताविक अमित पुंडे यांनी तर आभार तपस्वी गोंधळी यांनी मानले.

**स्पर्धेचा अंतिम निकाल**

गोळा फेक मुले– स्वराज उमेश शिंदे प्रथम क्रमांक, मीत राजन राऊत द्वितीय क्रमांक, भावेश मनोज भगत तृतीय क्रमांक. गोळा फेक मुली – कीर्ती संजय कडवे प्रथम क्रमांक, हर्षाली अभय गावंड द्वितीय क्रमांक, साक्षी शशिकांत पाटील तृतीय क्रमांक, ४०० मीटर धावणे मुले – यश दत्ताराम म्हात्रे प्रथम क्रमांक, सुशांत रवींद्र मढवी द्वितीय क्रमांक, अक्षय राजा लेंडी तृतीय क्रमांक, ४०० मीटर धावणे मुली – साक्षी जयेंद्र शिंदे प्रथम क्रमांक, आशिष निलेश पाटील द्वितीय क्रमांक, अक्षता महेंद्र वार्डे तृतीय क्रमांक,कबड्डी स्पर्धा मुले– विभागीय स्पोर्ट्स खारेपाट विभाग प्रथम क्रमांक, जय हनुमान मंडळ मुरुड द्वितीय क्रमांक, खो– खो स्पर्धा मुली– प्रिझम सामाजिक विकास संस्था प्रथम क्रमांक, कुलाबा क्रीडा प्रबोधनी, अलिबाग द्वितीय क्रमांक सर्व विजेत्या खेळाडूंना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

## रोहितचा डान्स व्हिडीओ व्हायरल

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६च्या थराराला अवघे काहीच दिवस शिल्लक असताना मुंबई इंडियन्सने आयोजित केलेल्या एका दिमाखदार फॅन इव्हेंटमध्ये माजी कर्णधार रोहित शर्माने केलेल्या डान्सने सर्वांचे लक्ष वेधले. त्याच्या या दिलखुलास अंदाजाचा व्हिडीओ सध्या इंटरनेटवर व्हायरल झाला आहे.

डिवाइनचे लोकप्रिय गाणे 'एक खोका, दोन खोका चार खोका' सुरू होताच रोहित शर्माला आपला मोह आवरता आला नाही. सुरुवातीला लेक समायराला कडेवर घेतलेल्या रोहितने गाण्याचा ताल धरताच तिला तिलक वर्माकडे सोपवले आणि स्वतः गाण्याच्या तालावर पूर्णपणे रंगून गेला. रोहितचा हा बेभान डान्स पाहून उपस्थित चाहत्यांनी एकच जल्लोष केला.

## पनवेलच्या निहाल भोईरला तायक्कांदो स्पर्धेत कांस्यपदक

### रायगड जिल्ह्यासाठी ऐतिहासिक कामगिरी

### श्रीजय भगतचा टॉप ८ मध्ये समावेश




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जालंधर (पंजाब) येथे पार पडलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्कांदो चॅम्पियनशिपमध्ये पनवेलच्या खेळाडूंनी आपली मोहोर उमटवली आहे. तायक्कांडो असोसिएशन ऑफ पनवेल शहरचा खेळाडू कु. निहाल संजय भोईर याने पुरुषांच्या ८० किलो वजनी गटात अटीतटीच्या लढतीत कांस्य पदक पटकावले. याच स्पर्धेत श्रीजय हरेश्वर भगत याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत टॉप ८ मध्ये स्थान मिळवले आहे.

अखिल भारतीय स्तरावर रायगड जिल्ह्याला अशा प्रकारचे यश मिळण्याची ही पहिलीच वेळ असल्याने संपूर्ण जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे. या दोन्ही खेळाडूंनी आपल्या कष्टाच्या जोरावर पनवेलचे नाव राष्ट्रीय क्रीडा नकाशावर कोरले आहे.

**सर्वस्तरातून कौतुकाचा वर्षाव**

या ऐतिहासिक यशाबद्दल पनवेल महानगर पालिकेच्या नगरसेविका दर्शना भोईर, ज्येष्ठ पत्रकार तथा रिपाइं पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे यांच्यासह तायक्कांडो क्षेत्रातील मान्यवरांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. यामध्ये तायक्कांडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष संदीप ओंबासे, सरचिटणीस अमजदखान (गफार) पठाण, आणि खजिनदार डॉ. प्रसाद कुलकर्णी यांनी देखील अभिनंदन केले आहे .

तसेच पनवेल शहर तायक्कांडो असोसिएशनच्या अध्यक्षा ॲड. प्रज्ञा संदीप भगत, सचिव संजय नागा भोईर, खजिनदार हेमंत कोळी, सहसचिव संदीप भगत, वीर तायक्कांडो असोसिएशनचे अध्यक्ष हरेश्वर भगत आणि सदस्य निखिल भोईर यांनी या खेळाडूंच्या जिद्दीचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## प्रशांत कावजी ठरला रायगड श्री



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग तालुक्यातील जय हनुमान बेलपाडा, कावाडे व्यायाम शाळा व शरद म्हात्रे आयोजित रायगड जिल्हास्तरीय बॉडीबिल्डीग स्पर्धेत जय हनुमान रायगड श्री २०२६चा मानकरी प्रशांत कावजी डिवाईन इनजी जिम अलिबाग चा मानकरी ठरला. तर उपविजेता श्रेयश म्हात्रे एच आर फिटनेस झीराड अलिबाग चा मानकरी ठरला. बेस्ट पोजर स्वप्नील सकपाळ मसल प्लॅनेट जिम तळा खारेपाट अंतर्गत सुनिल म्हात्रे भोइर जिमचा मानकरी ठरला.

तसेच खारेपाटण श्रींचा मानकरी समीर म्हात्रे विजेता ठरला. सदर स्पर्धो कोंकण बॉडीबिंल्डीग अँड फिजिक स्पोर्ट्स वेल्फेअर असोसिएशन अलिबाग–रायगड यांच्या मान्यतेने संपन्न झाल्या.सदर स्पर्धेत अलिबाग तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील सुमारे १०० स्पर्धेकांनी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा गेली १६ वर्षे सातत्याने भरवणारे आयोजक शरद म्हात्रे यांचे मोलाचे योगदान आहे. तसेच सदर स्पर्धेचा शुभारंभ माजी उपसभापती अनिल पाटील,आयोजक शरद म्हात्रे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाला.

स्पर्धेला प्रमुख अतिथी डी.एल सालावकर विस्तार अधिकारी अ.पं.पंचायत समिती, रायगड जिल्हा वरिष्ठ उपाअध्यक्ष राजाभाऊ ठाकूर, माजी पंचायत समिती सदस्य रंजित राणे, कैलास गजणे शिवसेना तालुकाप्रमुख, श्रीकांत पाटील, नितेश पाटील ग्रा.पं.सदस्य, तसेच खारेपाटातील सरपंच, उपसरपंच, सदस्य व विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच महिला वर्ग व युवक युवतीं उपस्थित होत्या.

विशेष म्हणजे बॉडीबिंल्डीग स्पर्धेत महिला स्पर्धेकांनी सहभाग घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली. सोनू रमेश कामे व वैष्णवी संदेश घरत यांनी हजारो प्रक्षेकांना आचार्य चकित केले. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांचा स्वागत आयोजक शरद म्हात्रे यांनी केला. स्पर्धेला बॉडीबिल्डिंग असोसिएशन चे पदाधीकारी अनिंकेत कदम, बाईन बंधु, दर्शन जाधव, सुनिल भोईर व सर्व पदाधीकारी, स्पर्धा पाहण्यासाठी मोठ्या संखेने जनसमुदाय उपस्थित होता.

## पहूर येथे भगवा चषक क्रिकेट स्पर्धा उत्साहात

**धाटाव : प्रतिनिधी**

पहूर येथे आयोजित करण्यात आलेल्या भगवा चषक २०२६ या भव्य नाईट क्रिकेट स्पर्धेचा थरार २१ मार्चच्या रात्री रंगला. प्रकाशझोतात खेळल्या गेलेल्या या सामन्यांनी क्रिकेटप्रेमींना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. तब्बल ३२ संघांच्या सहभागामुळे स्पर्धा अत्यंत रंगतदार आणि चुरशीची ठरली.

या स्पर्धेला विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यामध्ये सुप्रसिद्ध गायक प्रतीक पगारे, श्री गणेश दादा धनावडे (उपविभाग प्रमुख, ठाणे), अमृताताई धनावडे (रोहा तालुका महिला प्रमुख), युवा उद्योजक संतोष दादा धांद्रूत, सामाजिक कार्यकर्ते मंगेश शेठ सरफळे, विजयजी बोरकर (जिल्हा ग्राहक संरक्षण), निलेश साळुंखे (घाटाव विभाग प्रमुख), खामकर



(कोलाड विभाग प्रमुख), कुलदीप सुतार, चंद्रकांत लोखंडे, पत्रकार जितेंद्र जाधव, रमेश धनावडे, सोष्टे साहेब, संतोष दळवी, दिनेश वाढवळ, सागर जोगडे, सोनलताई मुंढे, मंगल धनावडे आदींचा समावेश होता.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रमुख आयोजक निखिल धनावडे यांनी पुढाकार घेतला. त्यांना मार्गदर्शक म्हणून प्रशांत धनावडे, सुजित धनावडे, चेतन धनावडे, महेश शिंदे, प्रवीण यादव, सचिन धनावडे, रोहित शिंदे, विष्णू धनावडे, समीर धनावडे आणि नथुराम यादव यांनी मोलाचे सहकार्य केले. स्पर्धेतील विजेत्यांची यादी पुढीलप्रमाणे प्रथम क्रमांक : श्री गोसावी बुवा उमरोली संघ , द्वितीय क्रमांक : श्री गुरुदत्त एंटरप्राइजेस, माणगाव, तृतीय क्रमांक : जय हनुमान, इंदापूर , चतुर्थ क्रमांक : TNSP पहूर संघ या चारही संघांना रोख रक्कम व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले

वैयक्तिक पुरस्कारांमध्ये उत्कृष्ट फलंदाज म्हणून प्रतीक गांधी, उत्कृष्ट गोलंदाज म्हणून भावेश (उमरोली), उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून देवेंद्र सुर्वे, तर उत्कृष्ट खेळाडूचा किताब सूरज उमासरे यांनी पटकावला. एकूणच, भगवा चषक २०२६ ही स्पर्धा उत्तम नियोजन, खेळाडूंचा उत्साह आणि प्रेक्षकांच्या उस्फूर्त प्रतिसादामुळे मोठ्या दिमाखात पार पडली. गावातील क्रीडा संस्कृतीला चालना देणारा हा उपक्रम ठरला असून भविष्यातही अशा स्पर्धा अधिक भव्य स्वरूपात आयोजित करण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला.




**पनवेल : श्री रामनवमीचे औचित्य आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षाचे निमित्त साधून भारतीय जनता पार्टी सांस्कृतिक सेल, उत्तर रायगडच्या वतीने एका विशेष सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.**







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com